१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार । दि. १७ सप्टेंबर २०२६ । अंक १०२ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## महिलेला धडक देऊन चालक पसार

**नेरळ :** कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर लाखरन येथे एका महिलेला धडक देऊन गाडी चालक आपल्या गाडीसह पसार झाला. या हिट अँड रन अपघातात जखमी झालेली महिला मृत्युमुखी पडली आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावर लाखरण येथे हिट अँड रनची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका वाहनाने रस्त्यावरून जात असलेल्या एका वृद्ध महिलेला जोरदार धडक दिली. पान २ वर

## मतदान केंद्रांवर विशेष शिबीर

**रायगड :** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) दि.३० सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती सादर करता येणार आहेत. या कालावधीत नवीन मतदार नोंदणी, मतदार यादीतील नोंदींची दुरुस्ती आणि नाव वगळण्यासाठी नागरिकांना अर्ज करता येणार आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर दि.१९ ते २७ सप्टेंबर या कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. मतदान केंद्रांवर सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत बीएलओ नागरिकांचे अर्ज स्वीकारणार आहेत. पान २ वर

वे|ध|क



## श्रीवर्धन मतदार संघात रोजगाराचा स्फोट

**म्हसळा :** श्रीवर्धन मतदार संघात बेरोजगारी आणि आरोग्य सेवेचा स्फोट झाला आहे. स्थानिक भूमिपुत्रांना डावलून परप्रांतीयांना नोकऱ्या वाटल्या जात असल्याच्या संतापातून १८ गाव आगरी युवा संघाने अखेर एल्गार पुकारला आहे.खारगाव बुद्रुक ते दिघी पोर्ट पर्यंत निघालेल्या विराट बाईक रॅलीने संपूर्ण श्रीवर्धन-म्हसळा हादरला असून, ''आम्हाला आमच्या हक्काचा रोजगार द्या, नाहीतर खुर्च्या खाली करा'' असा थेट इशारा सरकारला देण्यात आला आहे. श्रीवर्धन मतदार पान २ वर

## यूपीआय टॅक्स रद्द करण्याची मागणी

**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी यूपीआय व्यवहारांवर कर आकारण्याच्या केंद्र सरकारच्या भूमिकेवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. तसेच, यूपीआयवर लावलेला कर तत्काळ मागे घ्यावा, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. बुधवारी (दि.१६) सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक व्हिडिओ पोस्ट शेअर करत ते म्हणाले की, केंद्र सरकारने यूपीआयवर टॅक्स लावून आणि अमेरिकेला मोठा आर्थिक फायदा मिळवून देत भारतातील प्रत्येक सामान्य नागरिकावर अप्रत्यक्ष कराचा बोजा लादला आहे. त्यामुळे देशातील कोट्यवधी जनतेवर परिणाम करणाऱ्या या निर्णयाला विरोध करत राहुल गांधी यांनी हा यूपीआय टॅक्स त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे.

## आदित्य ठाकरेंनी मौन सोडले

**मुंबई :** दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणात एफआयआरमध्ये आदित्य ठाकरेंचे नाव असल्याचा दावा सतिश सालियन यांनी केला आहे. याप्रकरणात आदित्य ठाकरे यांनी यापूर्वीही फारशी वाच्यता केलेली नाही. मात्र, आता त्यांनी यावर मौन सोडले आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हणाले की, ''मी दिशा सालियान यांना कधीही भेटलेलो नाही किंवा त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझे नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरू आहे.''

# आज गौराईचे आगमन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात दीड दिवसांच्या बाप्पाच्या निरोपानंतर गुरुवारी (दि.१७) घरोघरी गौराईचे आगमन होणार आहे. यावेळी जिल्ह्यामध्ये १७ हजारहून अधिक ठिकाणी गौराईची विधीवत पुजा करून प्रतिष्ठापना केली जाणार आहे. त्यामुळे लाडक्या गौराईच्या स्वागतासह सजावटीसाठी भक्त विशेष करून महिला सज्ज झाल्या असून, गौराईच्या पुजनाचे साहित्य खरेदीची लगबग अलिबागसह जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये बुधवारी (दि.१६) दिसून आली. एक दिवसांच्या सेवेनंतर शनिवारी (दि.१९) सायंकाळी सहा दिवसांच्या बाप्पासह गौराईचे विसर्जन केले जाणार आहे.**

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सवाबरोबरच गौरीचे आगमन हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण म्हणून मानला जातो. यंदा गुरुवारी (दि.१७) जिल्ह्यात १७ हजारहून अधिक ठिकाणी गौराईचे आगमन होणार आहे. यावेळी विधीवत पुजा करून गौराईची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. त्यानंतर एक दिवस पुजन आणि जागरण घरोघरी होणार आहे. तसेच, वेगवेगळे धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक कार्यक्रम व पारंपारिक नृत्यांचे सादरीकरण करून जागरण केले जाणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात गौराईच्या आगमनासाठी व पुजेसाठी लागणाऱ्या वस्तूंची दुकाने ठिकठिकाणी सजली आहे. यादरम्यान जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये मोठी धुम पहायला मिळाली. मखरे, रंगीबेरंगी फुले, विद्यूत रोषणाईची आकर्षक अशी तोरणे, पितळ, शाडू आणि फायबरचे आकर्षक मुखवटे, दागिने, १६ भाज्यांचे साहित्य, ओवसा भरण्यासाठी लागणारे मातीची गाडगी अर्थात सुगडी, पुरणपोळी करंज्यासाठीचे साहित्य, सुप अशा वेगवेगळ्या वस्तू बाजार दिसून आल्या आहेत. तसेच, बाजारपेठांमध्ये गौरीचे श्रृंगार, सजावटीच्या वस्तूंची मोठी रेलचेल पहायला मिळाली. नक्षीकाम केलेल्या आकर्षक पान २ वर



### वस्तूंच्या किंमतीमध्ये १० टक्क्याने वाढ

गौराईच्या स्वागतासह आगमनासाठी लागणारे पुजेचे व सजावटीचे साहित्य खरेदीसाठी जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये बुधवारी सकाळपासून गर्दी झाली होती. मात्र, गतवर्षीच्या तुलनेने यंदा वेगवेगळ्या वस्तूंच्या किंमतीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. यावेळी सुपासह रेडीमेड मुखवटे, गजरे, हार, फुले या वस्तू दहा ते पंधरा टक्क्यांने महाग झाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली.



### १७ हजारहून अधिक ठिकाणी प्रतिष्ठापना



# मुंबई-नाशिक महामार्गावर भीषण अपघात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यात भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात मुंबईतील चौघांचा मृत्यू झाला असून, ६ जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त कुटुंब मुंबईतल्या जोगेश्वरी येथील रहिवासी आहेत. ते कुटुंबासह त्र्यंबकेश्वरला गेले होते. देवदर्शनाहून परतताना अटगावजवळ रस्त्याच्या कडेला असलेल्या ट्रकला त्यांच्या गाडीने जोराची धडक दिली. हा ट्रक दोन वर्षांपूर्वी जळाला होता आणि तसाच रस्त्याच्या कडेला होता. कारने दिलेली धडक इतकी भीषण होती की, या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. तसेच, मृतांमध्ये दोन चिमुकल्यांचा देखील समावेश असून, या अपघातात श्रीराम जैस्वाल, आयुष जैस्वाल, लाडो जैस्वाल आणि सुरज जैस्वाल यांचा मृत्यू झाला आहे. तर सहा जण जखमी झाले असून, त्यांच्यावर शहापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# कुत्र्यांचा उपद्रव ठरतोय जीवघेणा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये मोकाट कुत्र्यांचा उपद्रव जीवघेणा ठरत आहे. जानेवारी २०२५ ते ऑगस्ट २०२६ या वीस महिन्यांच्या कालावधीत साडेतीन हजारहून अधिक जणांवर मोकाट कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला आहे. या हल्ल्यात लहान मुले, महिला व वयोवृद्ध जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. त्यामध्ये २ हजार ६५१ जणांवर बाह्य रुग्ण कक्षात उपचार केले असून, १ हजार नऊ जणांना अधिक उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे नागरिकांना परिसरात जीव मुठीत घेऊन वावरण्याची वेळ आली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे. गल्लीसह वसाहती, एसटी स्थानक आणि रहिवासी भागांमध्ये मिळेल ते मासांहारी अन्न पदार्थ खाऊन मोकाट कुत्रे परिसरात फिरत आहेत. त्यामुळे लहान मुलांसह शाळकरी मुले, वयोवृद्ध व महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. तसेच, रस्त्यावर दुचाकीवरून ये-जा करतानादेखील मोकाट कुत्रे हल्ला करण्याच्या घटना दिवसेंदिवस घडत आहेत. जिल्ह्यामध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत २ हजार ११५, त्यानंतर जानेवारी ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत १ हजार ५४५ असे एकूण वीस महिन्यांत ३ हजार ६६० जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला आहे. त्यातील २ हजार ६५१ जणांना किरकोळ दुखापत झाल्याने त्यांच्या प्राथमिक उपचार करून सोडण्यात आले. मात्र, कुत्र्यांच्या हल्ल्यामध्ये १ हजार ९ जणांना गंभीर दुखापत झाली आहे. त्यामुळे त्यांना अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात अधिक उपचारासाठी दाखल केल्याची माहिती समोर येत आहे. पान २ वर

### साडेतीन हजार जणांवर हल्ला



### मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणाची गरज

रायगड जिल्ह्यामध्ये जानेवारी २०२५ पासून ऑगस्ट २०२६ या कालावधीत ३ हजार ६६० जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला आहे. त्यातील २ हजार ६५१ जखमी जणांवर बाह्य रुग्ण कशात उपचार केले असून, १ हजार नऊ जणांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. सुदैवाने मोठी जिवीतहानी टळली असली, तरी प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.

# ओएनजीसीविरोधात कामगारांचा एल्गार

- **रोजगारावर कथित कपातीमुळे संतापाचा भडका**
- **१७ कर्मचाऱ्यांना पूर्वसूचना न देता काढल्याचा दावा**

**। उरण । प्रतिनिधी ।**

वर्षानुवर्षे ओएनजीसीच्या कामकाजाचा गाडा आपल्या घामाने ओढणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर कथित कपातीची कुऱ्हाड चालविल्याने न्हावा सप्लाय बेसवर संतापाचा भडका उडाला आहे. कामगार कपातीविरोधात बुधवार दि.१६ सप्टेंबरपासून कंत्राटी कामगारांनी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले असून, या आंदोलनाला स्थानिक ग्रामस्थांसह महिलांनीही मोठ्या संख्येने पाठिंबा दिला आहे. ''न्याय हक्क आमचा आहे, भीक नाही!'' असा एल्गार करत कामगारांनी ओएनजीसी प्रशासनाला आरपारच्या लढ्याचा इशारा दिला आहे.



कामगारांच्या म्हणण्यानुसार, गेल्या पाच महिन्यांपासून कामगार कपात थांबविण्याबाबत ओएनजीसी प्रशासनाकडे पत्रव्यवहार तसेच प्रत्यक्ष बैठका घेण्यात आल्या. मात्र, ठोस तोडगा निघाला नसल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. त्यातच दि.३१ ऑगस्टपासून तब्बल २५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या १७ कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. पान २ वर

# गव्हाण फाट्यावर महिलेची हत्या

- **मृतदेह नाल्यात पुरून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार**
- **पोलिसांनी काही संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील गव्हाण फाटा येथे एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह परिसरातील नाल्यात पुरून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पनवेल शहर पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे.

गव्हाण फाटा येथील वाहतूक पोलीस चौकीजवळ एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह नाल्यात पुरून ठेवल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, पनवेल शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, पोलीस निरीक्षक नासिर पटेल तसेच गुन्हे शाखेची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी घटनास्थळी पाहणी करून नाल्यातून मृतदेह बाहेर काढला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, तपासादरम्यान काही संशयितांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे.

# वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तपासणार बाह्यरुग्ण

- **आठवड्यातून तीन तास अनिवार्य**
- **सार्वजनिक आरोग्य विभागाचा निर्णय**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील वरिष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांनी आता केवळ प्रशासकीय कामकाजापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष मैदानात उतरून रुग्णांची तपासणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त व अभियान संचालक संजय काटकर यांनी या बाबतचे आदेश जारी केले आहेत. वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी रूग्ण तपासणीसाठी फिल्डवर उतरणार असल्याने रूग्ण कक्षातील कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### बोगस डॉक्टरांना बसणार आळा

बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने डॉक्टरांसाठी क्यूआर कोड ही विशेष प्रणाली अनिवार्य केली आहे. त्यानुसार राज्यातील प्रत्येक नोंदणीकृत डॉक्टरला त्यांच्या दवाखान्यात, रुग्णालयात क्यूआर कोड असलेला नामफलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. या कार्यप्रणालीची ऑक्टोबर महिन्याअखेर अंमलबजावणी केली जाणार आहे. क्यूआर कोडमुळे रुग्णांना संबंधित डॉक्टरची नोंदणी, त्यांची शैक्षणिक पात्रता आणि वैद्यकीय व्यवसायाची वैधता यांची अचूक माहिती मिळवणे शक्य होणार आहे. त्यामुळे बनावट डॉक्टरांवर चाप बसणार आहे. क्यूआर कोड असलेला नामफलक दर्शनी भागात लावावा लागणार आहे. उपचारासाठी आलेला कोणताही रुग्ण आपल्या मोबाइलद्वारे हा क्यूआर कोड स्कॅन करून डॉक्टरचे नाव, नोंदणी क्रमांक, शैक्षणिक पात्रता आणि त्यांच्या परवान्याची वैधता याची माहिती मिळवू शकणार आहे.

जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक आणि राजिपचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना प्रशासकीय कामकाज पाहणे बंधनकारक होते. आपले प्रशासकीय काम संबहलून वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी रुग्ण तपासणी करण्यासाठी जात होते. परंतु, आता बाह्यरुग्ण तपासणी वरिष्ठ अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आल्याने या अधिकाऱ्यांना प्रशासकीय कामातून उसंत काढून रुग्ण तपासणी करून त्याचा अहवाल सादर करावा लागणार आहे. आता वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी स्वतःच मैदानात उतरणार आहेत. पान २ वर

# एसटी उलटून अपघात

**। बारामती । प्रतिनिधी ।**

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील सुपे येथील घाटात विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी एसटी बस उलटून झालेल्या अपघातात आठ विद्यार्थी जखमी झाले आहेत. तर, दोन जणांची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. बुधवारी (दि.१६) सकाळी ८.०० वाजताच्या दरम्यान हा अपघात झाला. एसटीचे वाहकही या अपघातात जखमी झाले असून, ते उपचार घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, बारामती आगाराची बस पाटस (ता.दौंड) येथून विद्यार्थ्यांना घेऊन कुसेगाव, पडवी मार्गे सुपे घाटातून सुप्याकडे येत असताना घाटाच्या सुरूवातीच्या वळणावर उलटून अपघात झाला. या बसमध्ये सुमारे ४० विद्यार्थी असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. काही जखमीं विद्यार्थ्यांना केडगाव-चौफुला येथील खासगी रूग्णालयात दाखल केले आहे. तर, दोन जणांना पुण्याला उपचारासाठी दाखल केल्याची माहिती विद्या प्रतिष्ठानच्या सुपे इंग्लिश मिडियम स्कुलचे प्राचार्य डॉ.योगेश पाटील यांनी दिली. अपघाताची माहिती कळताच घटनास्थळी पालकांसह मोठी गर्दी झाली होती.



### गार्बेट प्लाटून येथून परतताना वाट चुकले | स्थानिक तरूणांच्या मदतीने शोधले

# तीन ट्रेकर्सची सुखरूप सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानच्या डोंगर रांगेत असलेल्या गार्बेट प्लाटून येथे ट्रेकिंगसाठी आलेले तीन ट्रेकर्स रस्ता भरकटले होते. त्याबाबतची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली असता त्यांनी हेल्प फाऊंडेशनची मदत घेतली. दरम्यान, चिंचवाडी येथील दोन आदिवासी तरुण रात्री जंगलात पोहोचले आणि त्यांनी त्या तीन ट्रेकर्सना शोधून डिकसळ येथे सुखरूप आणले.

मुंबई-शीव परिसरातील दीपक वागवे, कोरक सिंह, आणि राघवेंद्र त्रिपाठी हे तीन तरुण कर्जत येथे ट्रेकिंगसाठी आले होते. यावेळी ते माथेरान डोंगर रांगेत असलेल्या गार्बेट प्लाटून येथे जाण्यासाठी डिकसळ येथे आले. त्यानंतर तेथून ते पाली-भूतिवली धरणाच्या बाजूने चिंचवाडी, सागाची वाडी असे करत धामणदांड येथून पुढे गेले. त्यानंतर ते गार्बेट प्लाटून येथे पोहोचले. या ठिकाणी तरूणांनी दिवसभर फिरून ते परतीच्या मार्गाला लागले. परंतु, त्यांना परतीचा मार्ग सापडत नव्हता. या ठिकाणी वाढलेले मोठमोठे गवत आणि पडणारा अंधार यामुळे त्यांच्या अडचणिंत वाढ होत होती. अंधार पडत असल्याने आणि सर्वत्र गवत असल्याने जंगली आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या विचाराने त्यांच्या भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शेवटी सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास त्या तरुणांनी हेल्पलाईनवर संपर्क साधला. त्यानंतर नेरळ पोलिसांना या तरूणांबद्दल माहिती मिळाली. त्यावेळी दाट अंधार पसरल्याने पोलिसांपुढे देखील अंधाराचे संकट होते; मात्र, तरीदेखील नेरळ पोलीस डिकसळ येथे जाण्यास निघाले. त्याचवेळी प्रभारी पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी ट्रेकर्सचा शोध लावण्यासाठी खोपोली येथील हेल्प फाऊंडेशनकडे मदत मागितली. त्यानंतर रात्री ९.०० वाजण्याच्या सुमारास हेल्प फाऊंडेशनकडून सुरेश पारधी आणि संदीप निरगुडे या स्थानिक दोन आदिवासींना मदतीसाठी पाठवण्यात आले. त्यांनी हरवलेल्या तरूणांनी सांगितलेल्या ठिकाणाचा मागोवा घेतला. अखेर त्यांनी मध्यरात्री गार्बेट प्लाटून परिसरातून परतताना वाट चुकलेल्या तरुण ट्रेकर्सना शोधले. त्यांना धीर देत खाण्याच्या वस्तू पुरविल्या. त्यानंतर त्या स्थानिक तरूणांनी मुंबईच्या तिन्ही ट्रेकर्सना रात्रीच्या अंधारात आणि पावसात डिकसळ येथे सुखरूप आणले. त्यानंतर या ट्रेकर्सनी सुटकेचा श्वास घेतला.



# मोरबे धरणाभोवती बांबूची भिंत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मोरबे धरणाभोवती आता १ लाख बांबू वृक्षाच्या लागवडीचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. राज्य सरकारने येत्या काही वर्षात राज्यभर ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट समोर ठेवले आहे. वेगवेगळ्या महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा तसेच ग्रामपंचायतींमार्फत हे उद्दीष्ट गाठण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे. या मोठ्या योजनेचा एक भाग म्हणून नवी मुंबई महापालिका प्रशासनाने मोरबे धरणाभोवती बांबू लागवड करण्याचा निर्णय घेतला.

खालापूर तालुक्यात असलेले मोरबे धरण हे महापालिकेच्या मालकिचे असून, या धरणाभोवती विस्तीर्ण अशी जागा वृक्ष लागवडीसाठी उपलब्ध करता येईल, असा अहवाल वृक्ष प्राधिकरणाने दिला आहे. त्यानुसार याठिकाणी कोणत्या वृक्षांची लागवड करता येईल, याचा अभ्यास मध्यंतरी करण्यात आला होता. राज्य सरकारने आखलेले ३०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पुर्ण व्हावे, यासाठी नवी मुंबई महापालिका क्षेत्रात अधिकाधिक वृक्षांची लागवड करण्याची आखणी करण्यात आली आहे. त्यामुळे मोरबे धरण क्षेत्रात १ लाख बांबू वृक्षांची लागवड करण्याचा निर्णय आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांनी घेतला आहे.

### गावठाणाभोवती बांबू लागवड

### १२ कोटी रुपयांची तरतूद

धरण क्षेत्र परिसरात मुख्य धरणाच्या भिंतींच्या खाली बांधण्यात आलेल्या भिंतीच्या भोवताली बांबू वृक्षांची लागवड केली जाणार आहे. धरणालगत असलेल्या गावठाणांच्या हद्दीलगत महापालिकेने यापूर्वीच भिंतीची उभारणी केली आहे. या भिंतींच्या कडेला बांबू वृक्षांची लागवड करणे शक्य आहे, असा अहवाल उद्यान विभागाने दिला आहे. याठिकाणी बांबूची लागवड केल्यास एक नैसर्गिक कुंपणभिंत तयार होईल आणि हा संपूर्ण परिसर हरित होईल. तसेच, धरण क्षेत्रातील सौंदर्यात आणखी भर पडू शकेल, अशी माहिती या प्रस्तावात देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी पावणे ३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षीत धरण्यात आला आहे. नवी मुंबई महापालिकेने यंदाच्या आर्थिक वर्षासाठी वृक्ष लागवडीसाठी १२ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे.

# गणेशोत्सवात पाली पोलिसांचे नियोजन

## •चाकरमान्यांसह पालीकरांचा प्रवास सुरळीत •अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नागरिकांकडून कौतुक

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व सुरक्षित व्हावा, तसेच पाली शहरातील वाढती वाहनांची गर्दी नियंत्रणात राहावी, यासाठी पाली पोलिसांनी यंदा चोख नियोजन करत वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवली. गणपती सणाच्या काळात शहरात सतत वाढणारी गर्दी आणि वाहनांची वर्दळ लक्षात घेऊन पोलिसांनी प्रमुख चौकांसह संवेदनशील ठिकाणी विशेष बंदोबस्त तैनात केला.



गणेशोत्सव काळात चाकरमान्यांचा कोकणात जाण्याचा कल मोठ्या प्रमाणात असतो. बहुतांश चाकरमानी हे पालीमार्गे कोकणात उतर असतता. तसेच, पाली हे अष्टविनायकापैकी एक ठिकाण असल्याने या दहा दिवसांत भक्तांची मोठी रेलचेल असते. या दरम्यान, पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गणेशोत्सव काळात प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी पार पाडली. शहरातून मोठ्या प्रमाणात चाकरमानी कोकणाकडे मार्गस्थ होत असल्याने वाहनांची संख्या वाढते. त्याचबरोबर बाजारपेठेतील नागरिकांची वर्दळ, स्थानिक वाहने आणि गणेशोत्सवासाठी होणारी गर्दी यामुळे वाहतुकीवर मोठा ताण येतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन पोलिसांनी आधीपासूनच नियोजन केले होते. शहरातील प्रमुख चौक, वर्दळीचे मार्ग आणि वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणी पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले. वाहनांना योग्य दिशा देणे, गर्दीच्या ठिकाणी वाहतूक सुरळीत करणे, वाहनांची कोंडी होऊ न देणे तसेच गरज भासल्यास तातडीने हस्तक्षेप करणे, यावर पोलिसांनी विशेष भर दिला. गणेशोत्सवाच्या काळात पाली शहरात नागरिकांची आणि वाहनांची सतत वर्दळ असतानाही पोलिसांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात नियंत्रणात राहिला. त्यामुळे कोकणाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांसह स्थानिक पालीकरांनाही दिलासा मिळाला.

गणेशोत्सव हा आनंदाचा आणि भक्तीचा सण असल्याने नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पाली पोलिसांनी घेतलेल्या मेहनतीचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात वाहनांची वाढती संख्या आणि गर्दीमुळे पाली शहरातील वाहतूक व्यवस्थेची परीक्षा होत असते. यंदा मात्र पोलिसांच्या पूर्वनियोजनामुळे वाहतूक कोंडीला मोठ्या प्रमाणात आळा बसला. अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता आणि रस्त्यावर प्रत्यक्ष उपस्थित राहून केलेले वाहतूक नियोजन यामुळे पाली पोलिसांचे कार्य विशेष कौतुकास्पद ठरले आहे.

# डिलिव्हरी बॉयला मारहाण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतमधील लाडिवली येथील नंदी गृहनिर्माण सोसायटीमध्ये राहणाऱ्या एका कुटुंबाने डिलिव्हरी बॉयला मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेनंतर डिलिव्हरी बॉयकडून कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत लाडीवली येथील नंदी को. ऑप. सोसायटी मधील प्लॉट नं ११ मध्ये राहणाऱ्या कुटुंबाने झोमॅटो वर काही वस्तूंची मागणी केली. ते खाद्य पदार्थ घेऊन जाणारा डिलिव्हरी बॉय हा काही मिनिटे उशिरा नंदी गृहनिर्माण सोसायटी मधील प्लॉट नंबर ११ येथे पोहचला. त्यावेळी ऑर्डर देणाऱ्या व्यक्तीने झोमॅटोची आर्डर लेट का आणली? असा प्रश्न करीत सोबत असलेल्या अन्य व्यक्तीसह शिवीगाळी केली आणि नंतर बाचाबाची झाली. नंतर संबंधित व्यक्तीने फोन करून आणखी एका व्यक्तीला बोलावून घेतले आणि या तिघांनी नंतर डिलिव्हरी बॉयला मारहाण केली. त्यात ऑर्डर देणाऱ्या व्यक्तीच्या फोनवर तेथे पोहोचलेल्या तरुणाने आपल्याकडील चावीच्या गुच्छामध्ये असलेल्या शस्त्राने डिलिव्हरी बॉयच्या दोन्ही हातावर, मानेवर मारून दुखापत केली. तरीदेखील हा प्रकार थांबला नाही आणि त्यानंतर त्या चार व्यक्तींनी युनिमाउंट बिल्डींग कर्जत येथे संगनमत करून हाताबुक्यानी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.



# प्रशासकीय भवनात उद्‌वाहक बसवणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील प्रशासकीय भवनातील दोन मजली इमारतीमध्ये दिव्यांगांच्या सोयीसाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नाही. इमारतीत उद्‌वाहक अथवा सरकता जिना नसल्याची बाब सार्वजनिक बांधकाम खात्याकडे सातत्याने केली जात होती. ही बाब माहिती अधिकार कार्यकर्ते अमोघ कुलकर्णी यांनी प्राधान्याने मांडली आणि आता प्रशासकीय इमारतीमध्ये उद्‌वाहक बसवण्यास निधीची तरतूद झाली आहे.

कर्जत तालुक्याचे प्रशासकीय भवन नव्याने बांधण्यात आले आहे. तेथे कर्जत तहसीलदार आणि कर्जत खालापूर या दोन तालुक्याचे प्रांत अधिकारी यांची कार्यालये आहेत. कर्जत येथील प्रशासकीय भवन ही तळमजला अधिक दोन मजली इमारत असल्याने वृद्ध, ज्येष्ठ नागरिक, अपंग बांधव आणि गरोदर महिलांना जिने चढ-उतार करताना मोठी दमछाक होत होती. उद्वाहक नसल्याने अनेकांना कामासाठी दुसऱ्याची मदत घ्यावी लागत होती. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अमोघ कुळकर्णी यांनी दि.१५ ऑगस्ट रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. त्यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी लेखी पत्र देऊन लवकरच मार्ग काढू असे आश्वासन देत उपोषण स्थगित केले होते. त्यानंतर कुळकर्णी यांनी दिवाळीपूर्वी निधी मंजूर करून देण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी राहुल देवांग यांनी माहिती दिली असून, प्रशासकीय भवनामध्ये उद्‌वाहक बसवण्यासाठी निधी मंजूर झाला असून लवकरच उद्‌वाहक बसविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे.

## रसायनीत गणपतींचे जल्लोषात आगमन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

गणेश चतुर्थीच्या मंगलमय पर्वानिमित्त रसायनी-पाताळगंगा परिसरातील असंख्य घरांमध्ये लाडक्या गणरायाचे मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात स्वागत करण्यात आले. ''गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया''च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला असून, घराघरांत गणेशोत्सवाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गणेशोत्सवाच्या तयारीत व्यस्त असलेल्या गणेशभक्तांची लगबग सोमवारी (दि.१४) सकाळपासूनच पाहायला मिळाली. मोहोपाडा शहरासह परिसरातील विविध भागांत गणेशमूर्ती घरी नेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. सजवलेल्या वाहनांमधून, ढोल-ताशांच्या गजरात आणि उत्साहपूर्ण वातावरणात गणरायाला आपल्या घरी आणण्यात आले. अनेक कुटुंबांनी पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करून गणरायाचे स्वागत केले. तर काही घरांमध्ये आकर्षक सजावट, फुलांची आरास, विद्युत रोषणाई आणि विविध देखावे साकारण्यात आले आहेत. त्यामुळे घराघरांत गणेशोत्सवाचा आनंद आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# गणेश विसर्जनासाठी वाहतुकीत बदल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खांदेश्वर तलाव व नवीन पनवेलमधील आदई तलाव परिसरात विसर्जनाच्या दिवशी होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतुकीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. गौरी-गणपती विसर्जनासाठी दि.१९ सप्टेंबर आणि अनंत चतुर्दशीसाठी दि.२५ सप्टेंबर रोजी हे बदल लागू राहणार आहेत.

यासंदर्भात खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी नवी मुंबईच्या पोलीस उपआयुक्त (वाहतूक विभाग) यांना अधिसूचना निर्गमित करण्याबाबत अधिकृत पत्र दिले आहे. या पत्राची प्रत



पनवेल शहर पोलीस वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांच्याकडेही पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

खांदा कॉलनी परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुयोग अपार्टमेंट व महात्मा

- **१९ व २५ सप्टेंबर रोजी प्रवेशबंदी**
- **पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन**

शाळा मार्गे खांदेश्वर तलावाकडे गणेशमूर्ती विसर्जनासाठी वाहतूक केली जाणार आहे. त्यामुळे त्रिमुर्ती गृहनिर्माण संस्था येथून महात्मा शाळेकडे जाणारा मार्ग तसेच श्री कृपा बँक्वेट हॉल येथून तलावाकडे जाणाऱ्या मार्गावर गणपती वाहने व ट्रॉलीसाठी प्रवेश बंद राहणार आहे. पर्यायी मार्ग म्हणून एक्सिस बँकेकडून तलावाकडे जाणारी वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डावीकडे वळविण्यात येतील. तसेच, आसुडगावकडून येणारी वाहने आगरी शिक्षण संस्थेच्या शाळेच्या नाल्यालगतच्या मार्गाने इच्छित स्थळी जाऊ शकतील.

हे वाहतूक बदल दि.१९ सप्टेंबर रोजी दुपारी २.०० वाजल्यापासून दि.२० सप्टेंबरच्या पहाटे ३.०० वाजेपर्यंत लागू राहतील. तसेच, दि.२५ सप्टेंबर रोजी दुपारी १२.०० वाजल्यापासून दि.२६ सप्टेंबरच्या पहाटे ५.०० वाजेपर्यंत हे निर्बंध अंमलात राहणार आहेत. मात्र, अत्यावश्यक सेवांमधील वाहनांना या प्रवेशबंदीतून वगळण्यात आले आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, वाहतूक नियमांचे पालन करावे आणि विसर्जन काळात पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### वाहतुकीचे नियोजन

नवीन पनवेल परिसरात आदई सर्कल ते आदई तलाव, तसेच भावना मेडिकल, गोकुळ डेअरी आणि हॉटेल फिनिक्स चौक मार्गे आदई तलावाकडे विसर्जन मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. तुलसी हाईट्स येथून भावना मेडिकलकडे जाणारा मार्ग बंद राहणार आहे. या मार्गासाठी सेक्टर ५, ६ आणि ७ मधील नागरिकांना डी-मार्ट व एचडीएफसी चौकाकडून आदई सर्कलकडे जाण्याचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे. खांदा कॉलनीकडून उड्डाणपुलावरून येणारी वाहने सेंट जोसेफ स्कूल व सेवेज पंप हाऊस मार्गे इच्छित स्थळी वळविण्यात येतील.

# महावितरणकडून अभियंता दिन साजरा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अभियांत्रिकी ही केवळ एक नोकरी किंवा व्यवसाय नसून तो देशाच्या प्रगतीचा आणि विकासाचा मुख्य कणा आहे. राज्यातील घरे, व्यवसाय, उद्योग, कृषी अशा ३ कोटींवर ग्राहकांकडे दररोज वीजपुरवठा पोहोचवण्यामागे अभियंत्यांचे कौशल्य व महत्वाचे योगदान आहे. वीजक्षेत्राच्या माध्यमातून महावितरणचे अभियंते राज्याच्या प्रगतीला गती देत आहेत, अशा शब्दांत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अभियंत्यांच्या योगदानाचा



गौरव केला.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त प्रकाशगड मुख्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी म मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी पाठवलेल्या शुभेच्छा संदेशामध्ये अभियंत्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

संचालक (वाणिज्य) योगेश गडकरी यांनी महावितरण समोरील बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अभियंत्यांनी अधिक जोमाने काम करण्याची गरज व्यक्त केली. संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार यांनी विविध आघाड्यांवर काम करताना ताण-तणावाचे योग्य व्यवस्थापन करून नोकरी व कुटुंब यांच्यात योग्य समतोल राखण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास मुख्य अभियंते मनीष वाठ, अंकुर कावळे, ज्ञानेश कुलकर्णी, मंगेश कोहाट, अशोक साळुंखे, संतोष सांगळे, प्रशांत दानोलीकर, पंकज तगलपल्लेवार, सुचित्रा गुजर, कविता घरत यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**पनवेल** : कॉलेजमध्ये जाणाऱ्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्यासोबत अश्लील कृत्य केल्याप्रकरणी जाफरअली अनवरअली शेख (१९) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याने अल्पवयीन मुलीचा सिकेटी कॉलेज ते आसुडगाव येथील घरापर्यंत पाठलाग केला. तिच्या इंस्टाग्राम आयडीवरून संपर्क करून तिला भेटण्यास बोलवले आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले.

## पान १ वरुन

### महिलेला धडक देऊन चालक पसार

या भीषण अपघातात वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. मात्र, अपघातानंतर संबंधित वाहनचालकाने घटनास्थळी न थांबता वाहनासह पळ काढला. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच, अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### श्रीवर्धन मतदार संघात रोजगाराचा स्फोट

संघातील समुद्रकिनारा वगळता इतर भागातील तब्बल ९० टक्के घरांना कुलूप लागले आहे. रोजगार नसल्याने तरुण आपल्या कुटुंबासह मुंबई-पुण्यात स्थलांतरित झाले आहेत. गावं ओस पडली आहेत, तर म्हातारे-कोतारे आरोग्य सेवेसाठी आजही मुंबई-पुण्याची वाट धुंडाळत आहेत. एकीकडे स्थानिक तरुण बेरोजगार म्हणून फिरत असताना, याच मतदार संघात दास ऑफशोर सारखी अवाढव्य जहाज बांधणी कंपनी आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचा दिघी पोर्ट आहे. मात्र, या दोन्ही कंपन्यांमध्ये स्थानिकांना लाथाडून परप्रांतीयांचे लोंढे भरले गेल्याचा गंभीर आरोप १८ गाव आगरी युवा संघाने केला आहे. हा स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय असून या लढ्याची ही सुरवात असल्याचे अध्यक्ष ॲड. धनंजय चौलकर यांनी सांगितले. दरम्यान, या रॅलीपूर्वी स्थानिकांना रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी म्हसळा ग्रामीण रुग्णालय, खरगाव, मेंदडी, बोर्ली व दिघी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात निवेदन देण्यात आले.

### कुत्र्यांचा उपद्रव ठरतोय जीवघेणा

दरम्यान, अलिबाग-रोहा मार्गासह अलिबाग-मुरूड, अलिबाग-पेण अशा अनेक भागांत मोकाट कुत्र्यांचा वावर प्रचंड वाढला आहे. त्यांच्या वाढत्या संख्येचा प्रचंड त्रास नागरिकांना होत आहे. रस्त्याने धावणाऱ्या वाहनांवर तसेच पादचाऱ्यांवर हल्ला करणे असे प्रकार घडत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे नागरी सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ग्रामीण भागात ग्रामपंचायतींनी या मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे गरजेचे असताना निधी अभावी तसेच अपूऱ्या मनुष्यबळामुळे हे काम होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. मोकाट कुत्र्यांवर अंकूश न राहिल्यास भविष्यात गावे, वाड्यांमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तपासणार बाह्यरुग्ण

त्यामुळे रुग्णांसेवेत होणारी हेळसांड थांबणार आहे.

या आदेशानुसार, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, तालुका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षक यांसारख्या उच्चशिक्षित वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध तीन आरोग्य संस्थांमध्ये आठवड्यातून किमान तीन तास बाह्यरुग्ण तपासणी करावी लागणार आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेचा आणि दीर्घ अनुभवाचा थेट फायदा रुग्णांना मिळावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. केवळ रुग्णतपासणीच नव्हे, तर या क्षेत्रभेटीदरम्यान अधिकाऱ्यांना रुग्णालयातील दैनंदिन कामकाज, औषधसाठा, लसी, वैद्यकीय उपकरणे आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती यांचीही बारकाईने पाहणी करावी लागणार आहे. विशेषतः अतिदक्षता विभाग, शिशू अतिदक्षता विभाग, प्रसूती कक्ष आणि शस्त्रक्रियागृहातील अतिमहत्त्वाच्या उपकरणांची देखभाल, अग्निशमन यंत्रणा आणि नियमित फायर ऑडिट अद्ययावत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित रुग्णालय प्रमुखांवर सोपवण्यात आली आहे.

या आदेशाची अंमलबजावणी केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्ष व्हावी यासाठी उपसंचालक पातळीवर दर आठवड्याला कामकाजाचा आढावा अहवाल आयुक्तालयाकडे सादर केला जाईल. क्षेत्रभेटी न घेणे, कर्तव्यात कसूर करणे किंवा रुग्णसेवेतील त्रुटींकडे दुर्लक्ष केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक प्रशासकीय कारवाई करण्याचा इशाराही शासनाने दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील आरोग्य व्यवस्थेचा दर्जा सुधारण्यास मोठी मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मतदान केंद्रांवर विशेष शिबीर

एसआयआर प्रारूप मतदारयादीमध्ये अनेक मतदारांची नावे गैरहजर, स्थलांतरित किंवा अन्य कारणांमुळे वगळण्यात आली आहेत. अशा मतदारांना त्यांच्या सध्याच्या रहिवासी ठिकाणाहून मतदारयादीमध्ये नव्याने नाव समाविष्ट करण्यासाठी दावे व हरकतींच्या कालावधीत अर्ज करता येणार आहे. तसेच, १ ऑक्टोबर रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. नवमतदार, प्रारूप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट न झालेल्या पात्र नागरिकांनी मतदार यादीत नाव नोंदणी करण्यासाठी तसेच नोंदीमध्ये सुधारणा किंवा नाव वगळण्यासाठी या विशेष शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच, मतदार यादी अधिक सर्वसमावेशक करण्यासाठी महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, अल्पसंख्याक तसेच इतर पात्र नागरिकांचा मतदार नोंदणीतील सहभाग वाढविण्यात यावा यासाठी विशेष जनजागृती आणि नोंदणी उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असे देखील प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

### आज गौराईचे आगमन

मुखवट्यांना यंदा अधिक पसंती दर्शविली आहे. साड्या, रेडीमेड मुखवटे, गजरे, हार, फुलांची सजावट आणि पुजेचे साहित्य बाजारात दाखल झाले आहेत. गौराईच्या पारंपारिक सजावटीमध्ये साडीला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे बाजारात वेगवेगळ्या रंगाच्या साड्या उपलब्ध झाल्या आहेत. बुधवारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी महिलांची अलोट गर्दी दिसून आली.

### ओएनजीसीविरोधात कामगारांचा एल्गार

या १७ कामगारांमध्ये क्रेन विभागातील कामगारांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचवेळी ओएनजीसी विभागातील पाच कामगारांना बडोदा येथे पाठविण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती कामगारांकडून देण्यात आली आहे. दुसरीकडे ओएनजीसी विभाग बंद करण्याच्या हालचाली असून या विभागात सुमारे १० ते १२ कामगार कार्यरत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यातच न्हावा ओएनजीसी सप्लाय बेसमधून पाईप आणि इतर साहित्य गुजरातमधील पिपावाव येथे नेण्यात येत असल्याचा दावा कामगारांनी केला आहे. जवळपास ४०० हून अधिक ट्रेलरमधून साहित्य गुजरातकडे नेण्यात आल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. त्यामुळे न्हावा सप्लाय बेसमधील कामकाजाचे भवितव्य, स्थानिक रोजगार आणि कंत्राटी कामगारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

त्यामुळे ''काम आमचे, घाम आमचा; मग रोजगार गुजरातला का?'' असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या कामगारांच्या रोजगाराचे भवितव्य स्पष्ट न करता विभाग बंद किंवा कामाचे स्थलांतर केले जात असेल, तर त्यामागचे कारण काय, असा सवालही आता उपस्थित होत आहे. यावेळी अध्यक्ष राजेश घरत, सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच शैलेश पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, हनुमान भोईर, आशिष पाटील, रवींद्र पाटील, राजेश म्हात्रे, गणेश पाटील, संजय ठाकूर, प्रदीप ठाकूर, चेतन कडू, रमेश भोईर, प्रीतम पाटील, राकेश पाटील, विशाल पाटील, नवनाथ म्हात्रे, अजय पाटील, जयंत पाटील, निलेश भोईर, गौतम गायकवाड, जगन्नाथ मोरे, सुशांत बोन्द्रे, समाधान म्हात्रे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांधकाम साईटवरील चोरीचा छडा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनीजवळील भोकरपाडा येथील हिरानंदानी फॉर्च्यून सिटीच्या बांधकाम साईटवरून सुमारे ५० सेंट्रिंग प्लेट्स तसेच ॲल्युमिनियम प्लेट्स चोरीला गेल्याची घटना घडली होती. चोरी झालेल्या साहित्याची अंदाजे किंमत अडीच लाख रुपये असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी रसायनी पोलिसांनी चोरीचा छडा लावत सहा आरोपींना जेरबंद केले. यावेळी अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहन पवार, राजू शिंदे, रवी चव्हाण, प्रिन्स पासवान, खरपत गुप्ता तसेच भंगार विक्रेता सोमनाथ गुप्ता यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच, चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमालही त्यांच्याकडून पोलिसांनी जप्त केला आहे. रसायनी पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे बांधकाम साईटवरून साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

## टाऊनशिपमध्ये घरफोडी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

लोधीवली येथील रिलायन्स टाऊनशिपमध्ये चोरट्याने घरफोडी करून सुमारे ९८ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व मौल्यवान साहित्य लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. दि.१३ सप्टेंबर रोजी ही चोरी झाली. लोधीवली येथील रिलायन्स टाऊनशिपमधील घर क्रमांक बी-३३ या घराच्या मुख्य दरवाजाचे लॉक तोडून चोरट्याने आंत प्रवेश केला. चोरट्याने बेडरूममधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व अन्य साहित्य असा एकूण ९८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हाके करीत आहेत.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.अनंत धनाजी जाधव रा. वाशी नवी मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे आपटवणे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| २१३ | २-६८-०० | ०-७५ |

या एकूण क्षेत्रापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र १-२६-०० हे.आर
पैकी ०-४०-० हे.आर

यांशी चर्तु सिमा:-
पूर्व- अंतर्गत रस्ता व पलीकडे गट नं १८१
पश्चिमेस गट नं २१३ पैकी उर्वरित क्षेत्र
दक्षिणेस गट नं १८७
उत्तरेस - गट नं २१३ पैकी उर्वरित क्षेत्र

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४(चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १७/०९/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**रोजगार अधिसूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने सिग्नल आणि दूरसंचार विभागातील खालील पदासाठी प्रारंभी एका वर्षाच्या कालावधीसाठी निश्चित मुदतीच्या कराराच्या आधारावर वॉक-इन-मुलाखतीद्वारे रोजगार अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

**रोजगार अधिसूचना क्र. सीओ/पी-आर/16सी/2026 दिनांक 27.08.2026**

| पदाचे नाव | यूआर | ईडब्ल्यू एस | ओबी सी | एस सी | एस टी | एकूण पदांची संख्या | वॉक-इन मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक/ सिग्नल आणि दूरसंचार | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 22.09.2026 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ www.konkanrailway.com वर लिंक → नियुक्ती → वर्तमान अधिसूचना पाहावी व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

# आनंदात आगमन, भक्तिभावात विसर्जन

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...'या गगनभेदी जयघोषात, गुलालाची उधळण आणि ढोल-ताशांच्या गजरात जिल्ह्यात दीड दिवसाच्या लाडक्या गणरायाला मंगळवारी (दि. १५) सायंकाळी गणरायाला भक्तीभावात निरोप देण्यात आला. जिल्ह्यात २६ हजार १८२ गणेशमूर्तींचे तलाव, नदी, समुद्र व खाडीमध्ये विसर्जन करण्यात आले. भक्तीमय आणि भावनिक वातावरणात हा निरोप सोहळा पार पडला. फुलांसह रोषणाईने गणेशमूर्तींची आरास सजवत बाप्पाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले होते. दीड दिवस सेवा केल्यानंतर मंगळवारी दुपारपासून विसर्जनाची तयारी सुरू झाली. पूजा, आरती झाल्यानंतर डोक्यावर तसेच चारचाकी वाहनातून मूर्ती घेऊन बेंजोच्या वाद्यांसह भजन करीत गावागावांतून, वाड्यावस्त्यांतून मिरवणुका काढण्यात आल्या. विसर्जनस्थळी पोहोचल्यानंतर सामूहिक आरती घेण्यात आली. नदी व तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गावांतील तरुणांनी स्वयंसेवक म्हणून भूमिका बजावली होती. प्रमुख विसर्जन घाट आणि कृत्रिम तलावांच्या ठिकाणी जीवरक्षक, अग्निशामक दल, रुग्णवाहिका आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कडक नजर होती. सुरक्षेच्या दृष्टीने ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते. उशिरापर्यंत विसर्जन प्रक्रिया शांततेत सुरू होती.






● 'बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने जड अंत:करणाने निरोप. (छायाचित्र : समीर मालोदे)



● (छायाचित्र : राजेश डांगळे)

● गणेशभक्तांनी भक्तीमय वातावरणात लाडक्या बाप्पाला निरोप दिला. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

# कर्जत तालुक्यात १९७२ गणरायांचे विसर्जन

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात ९२१० गणरायांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली असून आज सार्वजनिक व खासगी अशा एकूण दीड दिवसांच्या १९७२ गणरायांचे सश्रूनयनांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात विसर्जन करण्यात आले. विसर्जनाच्या वेळी पावसाने उघडीप दिल्याने श्री गणेशमूर्ती वाजत गाजत गणेश घाटांवर आणण्यात आल्या.

तालुक्यात दीड दिवस, पाच दिवस, सहा दिवस, अनंत चतुर्दशी, व २१ दिवस अशी श्री गणेश मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यापैकी एक सार्वजनिक व १९७१ खासगी अशा १९७२ दीड दिवसांच्या गणरायांचे विसर्जन करण्यात आले. यापैकी



● ( छायाचित्र : संजय गायकवाड)

१२३७ कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील, ६९५ नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणि ३९ माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अशा १९७१ खाजगी गणरायांचे व माथेरानमधील एकमेव सार्वजनिक गणेशमूर्तीचा समावेश आहे.

सायंकाळी चार वाजल्यापासूनच गणरायाच्या विसर्जनाला सुरुवात झाली. काहींनी वाजत गाजत तर काहींनी आप आपल्या चारचाकी वाहनांतून गणेश मूर्ती गणेश घाटांवर आणण्यात आले. काही गावांमध्ये तलावात विसर्जन करण्यात आले. विसर्जनाला कोणतेही गालबोट लागू नये म्हणून उप विभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## नागोठणे शहर परिसरात बाप्पांना निरोप



**| नागोठणे | प्रतिनिधी |**

नागोठणे शहर व परिसरात मोठ्या उत्साहात ढोल ताशांच्या गजरात फटक्यांची आतिषबाजी करत अतिशय भक्तीमय वातावरणात सोमवारी (दि.१४) गणेश चतुर्थीच्या दिवशी सर्वत्रच लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन झाले. नागोठणेसह परिसरातील गावागावांत 'गणपती बाप्पा मोरया.. मंगलमुर्ती मोरया' या जयघोषात सुमारे सार्वजनिक, घरगुती गणरायांची प्रतिष्ठापना करण्यात आली. यातील नागोठणे शहर व परिसरातील दीड दिवसांच्या दोन सार्वजनिक व सातशे दहा घरगुती गणपती बाप्पांची दोन दिवस मनोभावे सेवाभावी पूजा अर्चा करून मंगळवारी (दि. १५) सप्टेंबर रोजी सायंकाळी पारंपारिक पद्धतीने वाजत- गाजत-नाचत फटाक्यांची आतिषबाजी करत गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या.., गणपती गेले गावाला.. चैन पडेना आम्हाला.. अशा जयघोषात आपल्या लाडक्या गणपती बाप्पांना भक्तीमय वातावरणात भाविकांकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

नागोठणे शहर व परिसरातील ग्रामीण भागात दुपारी चार वाजल्यानंतर गणपती बाप्पांच्या विसर्जनास सुरुवात झाली. यावेळी सर्वगणेशभक्तांनीसहकुटुंबआपल्या लाडक्या गणपती बाप्पांना भक्तीमय वातावरणात भावपूर्ण निरोप दिला. दीड दिवसांच्या गणपती बाप्पांना निरोप देण्यासाठी भाविकांची दुपारनंतर विसर्जनासाठीची लगबग सुरु झाली होती. विधिवत पूजा, आरती करून व नैवेद्य दाखवून शहरातील जोगेश्वरी माता परिसरातील तलाव, श्रृंगार तलाव तसेच अंबा नदी विसर्जन घाट अशा विविध ठिकाणी गणेश भक्तांनी मोठया भक्तीमय वातावरणात आपल्या लाडक्या बाप्पाला रात्री उशिरापर्यंत निरोप दिला. यावेळी नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत शहर व परिसरातील ७१० घरगुती गणपती बाप्पांना भक्तगणांकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला.

दरम्यान, यावेळी आपल्या लाडक्या गणपती बाप्पांना निरोप देण्यासाठी नागोठणे शहरासह परिसरातील गावागावांत विसर्जन स्थळांवर मोठी गर्दी झालेली पाहवयास मिळाली होती.

## ढोल-ताशांच्या गजरात 'गणपती बाप्पाचा जयघोष!

**| उरण | प्रतिनिधी |**

'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या'! च्या जयघोषाने उरण परिसर दुमदुमून गेला. घराघरांत विराजमान झालेल्या दीड दिवसांच्या गणरायाला मंगळवारी भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. ढोल-ताशांचा कडकडाट, लेझीमचा ताल, फुलांची उधळण आणि गणरायाच्या जयघोषाने विसर्जन मिरवणुकांना अक्षरशः भक्तीच्या जल्लोषाचे स्वरूप आले होते. दीड दिवसांपूर्वी मोठ्या उत्साहात आणि भक्ती भावाने गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. विसर्जनासाठी गणरायाची आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांनी सजविलेल्या मूर्ती, पारंपरिक वेशभूषेतील गणेशभक्त, ढोल-ताशांचा दणदणाट आणि मोरया रे बाप्पा मोरया च्या घोषणांनी वातावरण अक्षरशः भारावून गेले. लहान मुलांपासून महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच विसर्जन सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. गणरायाला निरोप देताना भक्तांनी बाप्पाच्या चरणी सुख-समृद्धी, आरोग्य आणि सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना केली. पुढच्या वर्षी लवकर या अशी आर्त साद घालत भक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला. काही ठिकाणी पारंपरिक वाद्यांच्या साथीने तर काही ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका काढण्यात आल्या.



## अंबा नदी घाटावर भाविकांची गर्दी



**| पाली / बेणसे | प्रतिनिधी |**

पाली शहरासह सुधागड तालुक्यातील विविध गावांमध्ये गणेशभक्तांनी उत्साहात मिरवणुका काढत गणरायाला निरोप दिला. बाप्पाच्या आगमनाने निर्माण झालेला उत्साह विसर्जनाच्या वेळीही कायम होता; मात्र लाडक्या बाप्पाला निरोप देताना अनेक भाविकांच्या डोळ्यांत भावुकता दिसून आली.

अंबा नदी घाटावर भाविकांची मोठी गर्दी

पाली शहरातील अंबा नदी घाटावर दीड दिवसांच्या गणरायाच्या विसर्जनासाठी शेकडो भाविकांनी गर्दी केली होती. ढोल-ताशांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाच्या मूर्ती विसर्जनासाठी घाटावर आणण्यात आल्या. कुटुंबीयांसह आलेल्या भाविकांनी बाप्पाची अंतिम आरती करून भक्तीभावाने गणरायाला निरोप दिला.

विसर्जनाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच भाविकांना सुरक्षितपणे विसर्जन करता यावे, यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. विसर्जन मिरवणुका आणि घाट परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पाली पोलीस ठाण्याच्या वतीने चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला महापालिकेचा हातभार



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने शाडूच्या मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची व्यवस्था केली आहे. या उपक्रमाला गणेशभक्तांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन केल्यानंतर मूर्तीची उंची व इतर आवश्यक बाबींची नोंद घेतली जात आहे. पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करणाऱ्या भाविकांना महापालिकेच्या वतीने प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहन दिले जात आहे. पारंपरिक पद्धतीने नैसर्गिक जलस्रोतांमध्ये होणाऱ्या विसर्जनामुळे जलप्रदूषण होऊ नये, यासाठी कृत्रिम तलावाचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. शाडू माती पाण्यात सहज विरघळत असल्याने पर्यावरणावरील परिणाम कमी होण्यास मदत होते. 'पर्यावरण वाचवा, गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करा', असा संदेश महापालिकेच्या माध्यमातून देण्यात येत असून, नागरिकांनी पुढील वर्षीही मोठ्या संख्येने पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा स्वीकार करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## मातीच्या मूर्तीने वेधले लक्ष

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आगळावेगळा उपक्रम पाली येथे पाहायला मिळाला. डॉ. भिडे यांच्या कन्या नीहिरा यांनी शुद्ध मातीपासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करून भक्तीबरोबरच निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. दीड दिवसांच्या गणपती विसर्जनादरम्यान



पाली येथील गणपती विसर्जन घाटावर ही मातीची गणेशमूर्ती अनेकांचे लक्ष वेधून घेत होती.

पर्यावरणाला हानी पोहोचू नये आणि विसर्जनानंतर मूर्ती नैसर्गिक पद्धतीने मातीत मिसळावी, या उद्देशाने नीहिरा भिडे यांनी शुद्ध मातीचा वापर करून गणेशमूर्ती साकारली. मूर्तीला साधे, आकर्षक आणि पारंपरिक स्वरूप देण्यात आले होते. नैसर्गिक फुलांनी केलेली सजावटही मूर्तीच्या सौंदर्यात भर घालत होती.




'शेती वाचवा, गाव वाचवा'चा हुंकार | जमीन न विकण्याचे शेतकरी-युवांना आवाहन

# गणेशोत्सवाच्या देखाव्यातून 'तिसरी मुंबई'विरोधात रणशिंग!

**| उरण | प्रतिनिधी |**

गणपती बाप्पाच्या उत्सवाला सामाजिक प्रश्नांची जोड देत 'तिसरी मुंबई'विरोधातील लढ्याची जनजागृती थेट गणेशोत्सवाच्या देखाव्यातून करण्यात आली आहे. उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांमध्ये प्रस्तावित एमएमआरडीए केएससी नवनगर अर्थात 'तिसरी मुंबई' प्रकल्पाला शेतकरी संघटनांकडून विरोध केला जात असून, आता या विरोधाचा आवाज गणेशोत्सवाच्या देखाव्यातूनही घुमला आहे.




राज्य सरकारने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केल्यापासून या प्रकल्पाविरोधातील आंदोलनाला अधिक वेग आल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे. एका बाजूला सरकारकडून प्रकल्प पुढे नेण्याची भूमिका मांडली जात असताना दुसऱ्या बाजूला शेतकरी संघटना १२४ गावांमध्ये जनजागृती करत विरोधाची धार वाढवत आहेत.

एमएमआरडीए केएससी नवनगर 'तिसरी मुंबई' विरोधी शेतकरी समिती, रायगडचे सरचिटणीस रूपेश पाटील यांनी गणपतीच्या देखाव्यातून शहरी आणि ग्रामीण जीवनातील फरक प्रभावीपणे मांडला आहे. देखाव्यात एका बाजूला सिमेंटची जंगले, टोलेजंग इमारती आणि शहराचे जीवन, तर दुसऱ्या बाजूला शेती, घरे, गाव आणि ग्रामीण संस्कृतीचे चित्र उभे करण्यात आले आहे.

शेतीची जमीनच राहिली नाही, गावच उरले नाही, तर आमचे सण-उत्सव कसे साजरे करायचे? असा आर्त सवाल शेतकऱ्याच्या माध्यमातून गणपती बाप्पासमोर मांडण्यात आला आहे. शेतीची जमीन ही केवळ उत्पन्नाचे साधन नसून गावची संस्कृती, परंपरा आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी जोडलेली असल्याचा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे.

# विकासाचे स्वागत, पण...

रायगड जिल्ह्यातील दिघीमध्ये देशातील सर्वात मोठा जहाजबांधणी प्रकल्प उभारला जायचा आहे. याबाबतच्या एका करारावर मंगळवारी सह्या झाल्या. माझगाव डॉक आणि नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र या कंपन्यांमध्ये हा करार झाला. माझगाव डॉक ही या क्षेत्रातील अत्यंत जुनी व अनुभवी सरकारी कंपनी आहे. नॅशनल शिपबिल्डिंग ही या प्रकल्पासाठी खास स्थापन करण्यात आलेली विशेष कंपनी आहे. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारचे तिला पाठबळ आहे. कराराची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आणि करार करतेवेळी सर्व वरिष्ठ अधिकारी हजर होते. या प्रकल्पामध्ये २७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून ९० हजार रोजगार निर्माण व्हावेत अशी अपेक्षा आहे. यातले १५ हजार रोजगार प्रत्यक्ष प्रकल्पातले असतील तर आणखी ७५ हजार या प्रकल्पाच्या अवतीभवती त्याच्या अनुषंगाने निर्माण होतील. गुंतवणुकीपैकी १५ हजार कोटी माझगाव डॉकची असेल तर सहा हजार कोटी केंद्र व राज्य सरकारकडून येतील. या प्रकल्पाला दहा ऑगस्ट रोजी केंद्राची मान्यता मिळाली. त्यानंतर अवघ्या एका महिन्यात गोष्टी करारापर्यंत आल्या. सरकार अत्यंत आक्रमकपणे व वेगाने हा प्रकल्प पुढे नेऊ इच्छिते असा याचा अर्थ आहे. येत्या तीन वर्षात गोदीचे काम पूर्ण होईल अशीही आशा आहे. हे हजारो कोटींचे आकडे आणि मोठाले संकल्प चांगले आहेत. यामुळे दिघी व परिसराचा तसेच रायगड जिल्ह्याचा खरोखर विकास होणार असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. गोष्टी ठरल्याप्रमाणे घडल्या व कागदावर आणि टीव्हीच्या कॅमेऱ्यांसमोर जे सांगितले जात आहे तोच यामागचा हेतू असेल तर हे सर्व चांगलेच चित्र आहे. या प्रकल्पामुळे देशातील जहाजबांधणी क्षमतेच्या चाळीस टक्के क्षमता एकट्या महाराष्ट्रात राहणार आहे. प्रकल्पात व्यापारी वाहतुकीसाठीची आणि लष्करी अशी दोन्ही प्रकारची जहाजे बांधली जाणार आहेत. या प्रकल्पासाठी नांदगाव आणि विजयदुर्ग यांचाही विचार चालू होता. पण मुंबईला जवळ असल्याने अखेर दिघीने बाजी मारलेली दिसते.

### भूसंपादनाचा प्रश्न

मोदी सरकारच्या काळात बंदरांचा विकास करण्यावर मोठा जोर आहे. २०३० पर्यंत जगातील जहाजबांधणी करणाऱ्या पहिल्या दहा देशांमध्ये भारताचा क्रमांक यावा आणि २०४७ पर्यंत पहिल्या पाच देशांमध्ये आपण असावे अशी सरकारची महत्वाकांक्षा आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र सरकारने गेल्या वर्षी जहाज बांधणी, दुरुस्ती आणि जहाज तोडणीसंदर्भात स्वतःचे असे वेगळे धोरण जाहीर केले. असे करणारे ते देशातील एकमेव राज्य आहे. याच धोरणाच्या अंतर्गत पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या विकासाचे काम पुढे रेटले जात आहे. मुंबईला समांतर अशी उत्तर व दक्षिणेकडची दोन मोठी बंदरे एकाच वेळी विकसित करण्याचा हा प्रयत्न आहे. वर म्हटल्याप्रमाणे यातून खरोखर विकास होणार असेल प्रशंसनीय आहे. मात्र याची किंमत काय दिली जाणार आहे व ती कोण मोजणार आहे हेही सरकारने स्पष्ट करायला हवे. वाढवण बंदराला तेथील मच्छिमार, शेतकरी इत्यादींचा विरोध असून तेथे आंदोलने चालू आहेत. दिघीमध्येही हेच घडते आहे. याला मुख्यतः जबाबदार आहे ती प्रकल्पांमधील लपवाछपवी. स्थानिकांना विश्वासात न घेता, नेमका कसा विकास होणार आहे व त्याचे काय परिणाम होऊ शकतात याबाबत लोकांशी चर्चा न करताच असे प्रकल्प बहुतेकदा लादले जातात. हे फक्त बंदरांपुरतेच मर्यादित नसून नवी मुंबईसारखे विमानतळ, जैतापूरसारखे अणुउर्जा प्रकल्प किंवा शक्तीपीठासारखे रस्ते यांच्या बाबतही हेच घडते. दिघीमध्ये किनाऱ्यालगतच्या तीन किलोमीटर परिसरात दोन हजार एकर जमिनीवर हा प्रस्तावित प्रकल्प आकार घ्यायचा आहे. त्यातील प्रत्यक्ष जहाजबांधणीसाठी एक हजार एकर आणि इतर कामांसाठी एक हजार एकर अशी विभागणी आहे. यासाठी जमीन संपादनाचे काम सरकार करून देईल. सरकार हे काम कसे करते हे सर्वांना ठाऊक झाले आहे. स्थानिकांना विचारात न घेता धाडकन याबाबतची अधिसूचना किंवा राजपत्रित आदेश जारी केला जातो. त्यानंतर याबाबत कोणी आक्षेप घेतले तरी त्याला फार अर्थ नसतो. दिघीमध्ये किती नवीन भूसंपादन केले जाणार आहे हे लवकरच कळेल.

### मच्छिमार, स्थानिकांचे काय

बंदरांमध्ये अशी कामे सुरु झाली की त्याचा परिणाम मासेमारीवर होत असतो. माशांसाठी लांब जावे लागते. मच्छिमारांची हक्काची किनारपट्टी त्यांना बंद होते. सरकार सांगताना अडीच किलोमीटर म्हणत असले तरी प्रत्यक्षात खूप मोठा परिसर कंपन्या ताब्यात घेतात व मच्छिमार व नागरिकांना तेथून येणेजाणे कठीण होऊन बसते. जहाजबांधणीसोबतच इथे दुरुस्ती व जुनी जहाजे तोडण्याचा प्रकल्पही उभा राहणार आहे. यामध्ये प्रचंड प्रमाणात प्रदूषण होते. गुजरातेतील अलंगचे उदाहरण याबाबत कुप्रसिद्ध आहे. जुनी तेलवाहू टँकर जहाजे जेव्हा तोडली जातात तेव्हा त्यांच्यातले शिल्लक तेल समुद्रात पसरते व त्यातून मोठे प्रदूषण होते. याखेरीज जहाजांच्या तोडकामामध्ये इतर प्रकारचे प्रदूषण होत असते. त्यातच या धंद्याला सतत मंदीचा फटका बसत असतो. सध्या युद्धामुळे अलंग प्रकल्पात गेल्या महिन्यात केवळ एकच जहाज तोडण्यासाठी आले. त्यामुळे तेथील कंपन्या संकटात आल्या आहेत. जहाजबांधणीच्या कामामध्येही हे घडणारच आहे. पण या सर्व पुढच्या गोष्टी झाल्या. प्रकल्प उभा राहत असताना स्थानिकांचे काय होणार व स्थानिकांना किती रोजगार मिळणार हा यातला कळीचा प्रश्न आहे. त्याचे समाधानकारक उत्तर मिळायला हवे. यात आणखीही एक महत्वाचा कोन आहे. तो आहे अदानीचा. पूर्वी जादूचे प्रयोग करणारे स्टेजवर इंद्रजाल किंवा मायाजाल निर्माण करत व लोकांना गुंगवून टाकत. सध्या मोदी राजवटीमध्ये अदानी नावाचा असाच एक जादूगार उभा राहिला आहे. त्याने प्रचंड मायाजाल किंवा भ्रमजाल तयार केले आहे. दिघीच्या प्रस्तावित प्रकल्पात अदानीची नेमकी भूमिका काय किंवा त्याला याचा काय फायदा होणार हेही तपासायला हवे. दिघी बंदर दिवाळ्यात निघाल्यावर पाच वर्षांपूर्वी अदानीने त्यावर कबजा केला. सध्या तिथे तीन जेट्टी आहेत. बॉक्साईट, कोळसा इत्यादींच्या वाहतुकीसाठी त्या वापरल्या जातात. पण इथला धंदा वा बंदराचा वापर पुरेसा नाही. शिवाय इथे सोईसुविधाही वाढवण्याची गरज आहे. या नव्या प्रकल्पाच्या निमित्ताने सरकार या सोईंमध्ये पैसे घालेल. जहाजबांधणी प्रकल्पाचे वर्णन ग्रीनफील्ड क्लस्टर असे करण्यात आले आहे. त्याचा मतलबच असा की, पैसा सरकारने टाकायचा, सुविधा निर्माण करायच्या आणि नंतर पुढचा धंदा करायला त्या खासगी लोकांकडे सोपवायच्या. जहाजबांधणी प्रकल्पाच्या निमित्ताने यातले नेमके काय घडणार आहे हे काही दिवसांनी कळेल. मधल्या काळात स्थानिक लोक व राजकीय कार्यकर्त्यांनी सजग राहायला हवे, एकजूट करायला हवी व या प्रकल्पाचा आपल्याला नक्की किती उपयोग आहे याचा अभ्यास करायला हवा.

---

**। विचार**

# कर्जमाफीचा निर्णय, की व्यवस्थेची कसोटी?

*दिवाळखोरी प्रक्रियेत कर्जदात्या बँकांना काही प्रमाणात तोटा सहन करावा लागतो, हे मान्य असले, तरी कर्जवसुलीचे प्रमाण ९० टक्क्यांच्या 'हेअरकट'पर्यंत घसरते, तेव्हा प्रक्रियेचे औचित्य संपुष्टात येते. कॉर्पोरेट जगतात कंपन्या मर्यादित दायित्वाच्या तत्त्वावर चालतात; परंतु प्रवर्तक वैयक्तिक हमी देतात, तेव्हा त्यांची वैयक्तिक संपत्ती कर्जाच्या सुरक्षिततेसाठी गहाण असते. सुभाष चंद्रा यांच्या प्रकरणाच्या निमित्ताने हा विषय चर्चेत आला आहे.*




**भागा वरखडे**

हजारो कोटी रुपयांच्या कर्जाच्या दाव्यांपुढे अवघी काही कोटी रुपयांची परतफेड करण्याची योजना मंजूर होते आणि काही दिवसांमध्येच मोठे खंडपीठ त्या निर्णयाला स्थगिती देते. संबंधित गॅरंटरच्या संपत्तीचे हस्तांतरण, विक्री किंवा गहाण ठेवण्यावरही निर्बंध घातले जातात. हे चित्र कोणत्याही सक्षम दिवाळखोरी व्यवस्थेला अस्वस्थ करणारे आहे. सुभाष चंद्रा यांच्या व्यक्तिगत हमीशी संबंधित प्रकरणात घडलेली ही घडामोड त्यामुळे केवळ एका उद्योगपतीपुरती मर्यादित राहत नाही; तर 'एनसीएलटी'च्या निर्णयप्रक्रियेच्या स्पष्टतेवर आणि देशातील दिवाळखोरी व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करते. मूळ प्रकरणात सुमारे २२ हजार सहा कोटी रुपयांचे मंजूर दावे होते आणि त्याच्या तुलनेत साडेसहा कोटी रुपयांच्या परतफेडीच्या योजनेला २५ ऑगस्टला मंजुरी मिळाल्याचे समोर आले. हा आकडा पाहता जवळपास ९९.९ टक्क्यांचा 'हेअरकट' असल्याचे चित्र निर्माण झाले. नंतर या आकडेवारीमागील वास्तविकता अधिक गुंतागुंतीची असल्याचे स्पष्ट झाले. २२ हजार कोटींच्या दायित्वात अनेक कर्जदारांचा समावेश होता आणि त्यातील काही रक्कम इतर देणेकऱ्यांशी संबंधित होती. स्वतः चंद्रा यांच्यावरील दाव्याची रक्कमही वेगळी होती. त्यामुळे २२ हजार कोटींच्या कर्जावर फक्त साडेसहा कोटी अशी सरळ मांडणी पूर्ण सत्य नाही; पण त्यामुळे मूळ प्रश्न संपत नाही. उलट, अधिक गंभीर होतो. नेमका दावा किती? त्यातील कोणता भाग कोणाच्या नावावर? किती रक्कम आधीच निकाली निघाली? उर्वरित देणी किती? आणि प्रस्तावित योजनेतून कर्जदारांना प्रत्यक्ष किती मिळणार? या प्रत्येक प्रश्नाचे स्पष्ट उत्तर असणे आवश्यक आहे. कारण दिवाळखोरीची प्रक्रिया ही केवळ कायदेशीर कसरत नसते. त्यात बँका, वित्तीय संस्था, विमा कंपन्या आणि अखेरीस सामान्य ठेवीदारांचा पैसा गुंतलेला असतो.

अलिकडेच 'एनसीएलटी'च्या पाचसदस्यीय खंडपीठाने आधीच्या आदेशाला स्थगिती देताना एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. आधीच्या तीनसदस्यीय खंडपीठात स्पष्ट बहुमत नव्हते. न्यायाधीशांची मते वेगवेगळी होती आणि त्यानंतर तिसऱ्या न्यायाधीशांचे मतही वेगळे असल्याचे नव्या खंडपीठाने नमूद केले. त्यामुळे २५ ऑगस्टचा आदेश अंमलात आणता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. ही बाबच या संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य दाखवते. न्यायालयीन प्रक्रियेत मतभेद असू शकतात. ते स्वाभाविक आहेत; पण अंतिम आदेश देताना प्रक्रिया स्पष्ट आणि कायदेशीरदृष्ट्या निर्विवाद असणे अपेक्षित आहे. विशेषतः हजारो कोटी रुपयांचा प्रश्न असेल, तर निर्णयाच्या वैधतेबाबतच संभ्रम निर्माण होणे परवडणारे नाही. दिवाळखोरी आणि नादारी संहिता लागू करण्यामागे एक मोठा उद्देश होता, तो म्हणजे कर्जवसुलीची प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबू नये, अडचणीत आलेल्या मालमत्तेचे मूल्य वाया जाऊ नये आणि कर्जदारांना शक्य तितकी वसुली मिळावी. जुन्या कर्जवसुली व्यवस्थेतील विलंबाला पर्याय म्हणून 'आयबीसी'कडे पाहिले गेले. त्यामुळे 'एनसीएलटी'कडून होणाऱ्या निर्णयांमध्ये वेगासोबतच अचूकता आणि पारदर्शकता असणे अत्यावश्यक आहे. कारण चुकीचा किंवा प्रक्रियात्मकदृष्ट्या संदिग्ध निर्णय हा विलंबापेक्षाही अधिक नुकसानकारक ठरू शकतो. या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा आदेश देण्यात आला आहे. गॅरंटरला आपली संपत्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे हस्तांतरित, विक्री किंवा गहाण ठेवता येणार नाही. हा आदेश कर्जदारांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

अंतिम निर्णय होण्यापूर्वीच संबंधित मालमत्ता हातातून गेली, तर नंतर न्यायालयीन आदेश मिळूनही वसुली करणे कठीण होऊ शकते; पण इथेही एक मूलभूत प्रश्न आहे, तो म्हणजे कर्जवसुलीची प्रक्रिया सुरू असताना संपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी यंत्रणा आधीपासून पुरेशी सक्षम का नसावी? एखाद्या मोठ्या प्रकरणात शेवटच्या टप्प्यावर अशा प्रकारचे निर्बंध लावावे लागणे हे प्रक्रियेत कुठे तरी उणीव असल्याचे लक्षण नाही का? 'हेअरकट' हा दिवाळखोरी प्रक्रियेचा अविभाज्य भाग असू शकतो. अडचणीत आलेल्या कंपनीची मालमत्ता तिच्या मूळ किमतीत विकली जाईलच असे नाही. त्यामुळे कर्जदारांना काही रक्कम सोडावी लागणे व्यवहार्य असू शकते; पण ९९ टक्क्यांपेक्षा अधिक हेअरकटचा प्रश्न निर्माण होत असेल, तर त्यामागील कारणांची कसून तपासणी झाली पाहिजे. मालमत्तेचे मूल्यांकन कसे झाले? संभाव्य खरेदीदारांकडून किती बोली आल्या? इतर पर्यायांचा विचार झाला का? गॅरंटरकडे असलेल्या मालमत्तेचा आणि आर्थिक क्षमतेचा पुरेसा विचार झाला का? कर्जदारांच्या हितासाठी उपलब्ध असलेल्या सर्व कायदेशीर पर्यायांचा वापर झाला का? अशा प्रश्नांची उत्तरे पारदर्शकपणे मिळाली पाहिजेत. कारण हे पैसे कुणा एका संस्थेचे नसतात. एलआयसी, एचडीएफसी किंवा इतर वित्तीय संस्थांच्या ताळेबंदात दिसलेला तोटा शेवटी आर्थिक व्यवस्थेवर परिणाम करतो. बँकांचे कर्ज म्हणजे मोठ्या प्रमाणावर जनतेच्या ठेवींचा पैसा. त्यामुळे मोठ्या कर्जावर होणारा प्रचंड हेअरकट हा केवळ 'व्यावसायिक निर्णय' म्हणून झटकून टाकता येणार नाही.

त्याच वेळी, प्रत्येक कर्जबुडीत व्यक्तीला आपली संपूर्ण संपत्ती गमवावीच लागेल, अशी भूमिकाही योग्य नाही. दिवाळखोरी कायद्याचा उद्देश शिक्षा देणे नाही; तर आर्थिक अडचणीतून कायदेशीर आणि न्याय्य मार्गाने बाहेर पडण्याची प्रक्रिया उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे कर्जदार आणि कर्ज देणारा, असे दोघांचेही हक्क जपणारा समतोल आवश्यक आहे. याच ठिकाणी 'एनसीएलटी'ची भूमिका निर्णायक ठरते. निर्णय लवकर व्हावेत; पण केवळ लवकर निर्णय होण्यासाठी प्रक्रियात्मक काटेकोरपणाशी तडजोड होता कामा नये. एका खंडपीठाचा आदेश आणि त्यानंतर मोठ्या खंडपीठाची स्थगिती अशी परिस्थिती वारंवार निर्माण झाली, तर 'आयबीसी'च्या मूळ उद्देशालाच धक्का बसतो. उद्योगजगताला आणि वित्तीय संस्थांना कायद्याच्या स्थैर्याची खात्री हवी असते. या प्रकरणामुळे काही जुन्या प्रकरणांमधील मोठ्या हेअरकटचाही मुद्दा चर्चेत आला आहे; मात्र या एका प्रकरणाच्या आधारावर पूर्वी मंजूर झालेल्या प्रत्येक योजनेवर संशय घेणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक प्रकरणाची तथ्ये वेगळी असतात; पण ज्या प्रकरणांमध्ये निर्णयप्रक्रियेबाबत गंभीर शंका आहेत. मूल्यांकनावर प्रश्न आहेत किंवा कर्जदारांच्या हिताचा पुरेसा विचार झाला नाही, अशा प्रकरणांचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याची गरज नक्कीच आहे. आर्थिक व्यवस्थेत शिस्त हवी असेल, तर कर्ज घेणाऱ्यालाही एक स्पष्ट संदेश असला पाहिजे. कर्ज फेडण्याची जबाबदारी टाळण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेचा गैरफायदा घेता येणार नाही. त्याच वेळी कर्ज देणाऱ्या संस्थांनाही संदेश असला पाहिजे तो म्हणजे मोठ्या कर्जाचे निर्णय घेताना जोखीम तपासणी आणि जबाबदारीपासून पळता येणार नाही.

दिवाळखोरी व्यवस्था या दोन्ही बाजूंमध्ये संतुलन साधणारी असली पाहिजे. सुभाष चंद्रा प्रकरणाचा अंतिम निकाल काय लागतो, हे आता पुढील सुनावणीत ठरेल. त्यामुळे आजच कोणाला दोषी किंवा निर्दोष ठरवण्याची गरज नाही; पण या प्रकरणाने जी अस्वस्थ करणारी बाब समोर आणली आहे, तिच्यावर मात्र गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. हजारो कोटींच्या दाव्यांच्या प्रकरणात निर्णयच प्रक्रियात्मक संभ्रमात सापडत असेल, तर आर्थिक व्यवस्थेचा विश्वास कसा टिकणार? 'आयबीसी'ची ताकद ही त्याच्या कठोरतेत नाही, तर ती त्याच्या विश्वसनीयतेत आहे. कर्जदारांना आपले पैसे वसूल होतील, कर्जबुडीत व्यक्तीला कायदेशीर प्रक्रिया न्याय्य असेल आणि उद्योगांना संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग उपलब्ध असेल, असा विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'एनसीएलटी'च्या निर्णयप्रक्रियेत अधिक स्पष्टता, वेळेत आणि काटेकोर सुनावणी, मालमत्तेच्या मूल्यांकनामध्ये पारदर्शकता आणि कर्जदारांच्या हिताचे प्रभावी संरक्षण या चार बाबींना प्राधान्य द्यावे लागेल. कर्जाच्या रकमेवर किती हेअरकट झाला, यापेक्षा त्या हेअरकटमागे न्याय्य प्रक्रिया झाली का, हा खरा प्रश्न आहे. सुभाष चंद्रा प्रकरणाने हा प्रश्न देशासमोर आणला आहे. आता त्याचे उत्तर केवळ या एका प्रकरणाच्या अंतिम निकालातून नव्हे, तर दिवाळखोरी व्यवस्थेतील प्रक्रियात्मक विश्वासार्हता अधिक मजबूत करण्याच्या प्रयत्नांतून मिळाले पाहिजे. कारण बँकांचा पैसा वाचवणे हा केवळ बँकांचा प्रश्न नाही, तर तो सामान्य ठेवीदारांचा प्रश्न आहे आणि दिवाळखोरी कायद्याची प्रतिष्ठा राखणे हा केवळ 'एनसीएलटी'चा नाही, तर देशाच्या संपूर्ण आर्थिक व्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न आहे.

---

**। चर्चा आजची**

# ८० च्या ट्रेंडला सायबर धोका?




**वैभव पाटील**

सध्या सोशल मीडियाच्या बदलत्या दुनियेत १९८० चा ट्रेंड चांगलाच धुमाकूळ घालताना दिसत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या मदतीने स्वतःचे किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांचे फोटो थेट १९८० च्या दशकातील वातावरणात असल्याप्रमाणे तयार करून ते सोशल मीडियावर शेअर करण्याची क्रेझ वाढली आहे. त्यामुळे जुन्या आठवणींना आधुनिक तंत्रज्ञानातून नवा चेहरा मिळत आहे. मात्र, या मनोरंजनामागे सायबर गुन्ह्यांचा गंभीर धोका दडलेला असल्यामुळे ८० च्या ट्रेंडची मशाल जपताना, डिजिटल सुरक्षिततेचे भान ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सायबर तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

सोशल मीडिया युजर्स वाढल्यापासून अचानक कोणतातरी ट्रेंड तयार होतो आणि तो ट्रेंड क्षणार्धात अवघ्या जगाला त्याच्या कवेत घेतो. असंच काहीसं आता नव्या ट्रेंडबाबत झालं आहे. होय, इन्स्टाग्रामवर आता नव्या ट्रेंडने एन्ट्री मारली आहे. यामध्ये सध्याच्या काळातील फोटोंना आता ८० च्या दशकांतील फोटोमध्ये बदलले जात आहे. असे फोटो बनवण्यासाठी चॅटजीपीटीसारख्या एआय ॲप आणि टूल्सचा वापर केला जात आहे. एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार झालेला ट्रेंड तुफान व्हायरल झाला आहे. यामध्ये बनणारे फोटो काय साधारण नाहीत तर, ते फोटोतील व्यक्ती, त्याच्या अंगावरील कपडे, त्याचे किंवा तिचे केस, एवढंच नाही तर त्याच्या आजूबाजूचा परिसरही अगदी हुबेहूब ८० च्या दशकातील भासावेत असेच बनवत आहे. त्यामुळे आता प्रत्येकाला त्याचा या ट्रेंडमधील फोटो बनवून सोशल मीडियावर पोस्ट करायचा आहे, पण प्रत्येकाला हा फोटो कसा बनवायचा, याबद्दल माहिती असेलच असं नाही.

मोबाईलमध्ये उपलब्ध असलेल्या विविध एआय फोटो एडिटिंग साधनांच्या मदतीने सध्याच्या फोटोचे रूपांतर जुन्या काळातील छायाचित्रासारखे केले जात आहे. त्यामध्ये त्या काळातील कपडे, हेअरस्टाईल, सायकल, जुन्या काळातील घरांची रचना, बाजारपेठ, वाहनांची शैली तसेच छायाचित्राचा जुना पोत यांचा वापर केला जात असल्याने फोटो पाहताना अनेकांना आपला भूतकाळ डोळ्यासमोर उभा राहत आहे. विशेष म्हणजे, केवळ तरुणाईच नव्हे तर जुन्या पिढीतील नागरिकही या ट्रेंडमध्ये सहभागी होत आहेत. काही जण स्वतःचा तरुणपणीचा लूक तयार करून घेत आहेत, तर काही जण आई-वडील, आजी-आजोबा किंवा मित्रपरिवारासोबतचे १९८० च्या दशकातील काल्पनिक फोटो तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करीत आहेत. एकीकडे जुन्या आठवणींना उजाळा देण्याचे काम हा ट्रेंड करत असताना दुसरीकडे आधुनिक तंत्रज्ञान वेगाने बदलत आहे. १९८० च्या दशकातील साधी जीवनशैली, पारंपरिक पोशाख, जुन्या वस्तू आणि त्या काळातील वातावरण याबाबत आजच्या पिढीमध्येही उत्सुकता आहे. त्यामुळे एआयच्या माध्यमातून तयार होणाऱ्या या छायाचित्रांना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. अनेक फोटो व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम आदी माध्यमांवर शेअर होत असून त्यावर कमेंट्स आणि प्रतिक्रिया उमटत आहेत.

मात्र, या मनोरंजनामागे सायबर गुन्ह्यांचा गंभीर धोका दडलेला असल्यामुळे ८० च्या ट्रेंडची मशाल जपताना, डिजिटल सुरक्षिततेचे भान ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सायबर तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. कारण ८० च्या दशकातील फोटो तयार करण्यासाठी आपला चेहरा असलेले छायाचित्र ज्या संकेतस्थळावर किंवा ॲपवर अपलोड केले जात आहे, त्या सेवेचे गोपनीयता धोरण काय आहे आणि अपलोड केलेल्या छायाचित्राचा वापर कसा प्रकारे केला जाऊ शकतो, याची माहिती घेणेही आवश्यक आहे. खरे तर या ट्रेंडबाबत फार मोठी भीती बाळगण्याची गरज नसली, तरी अंधविश्वासही ठेवता कामा नये, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे. विश्वासार्ह एआय सेवा वापरणे, तिच्या गोपनीयता अटी वाचणे आणि अनावश्यक वैयक्तिक माहिती देणे टाळणे, एवढी प्राथमिक काळजी घेतली, तरी धोका कमी करता येतो. लहान मुलांचे फोटो, घराचा पत्ता किंवा आतील रचना स्पष्ट दिसणारी छायाचित्रे, ओळखपत्रे, कागदपत्रे वा अन्य संवेदनशील माहिती असलेले फोटो अनोळखी सेवांवर अपलोड करणे टाळायला हवे, असे आवाहन सायबर तज्ज्ञांकडून केले जात आहे.

जुन्या आठवणी, कुटुंब, मैत्री किंवा भावनिक नात्यांचा आधार घेत बनावट ओळख निर्माण केली जाऊ शकते. त्यानंतर विश्वास संपादन करून वैयक्तिक माहिती, आर्थिक तपशील किंवा अन्य संवेदनशील माहिती मिळवण्याचा प्रयत्न होऊ शकतो. ८० ट्रेंड आनंद देणारा ठरत असला, तरी त्यातून धोकाही मोठा आहे. न मागताच आपण आपले फोटो एआयला सुपूर्द करीत आहोत. एआय तंत्रज्ञानामुळे एखाद्या व्यक्तीचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरावर किंवा वेगळ्या प्रसंगात सहज बसवता येतो. अशा पद्धतीने तयार केलेले बनावट छायाचित्र किंवा चित्रफीत खऱ्यासारखी भासू शकते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीची प्रतिमा, प्रतिष्ठा आणि सामाजिक विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते. आज केवळ मनोरंजनासाठी तयार केलेले छायाचित्र भविष्यात चुकीच्या संदर्भात वापरले जाण्याची शक्यता असल्यामुळे अधिक काळजी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

---

**लोकसंसद**

### भारतीय महिला क्रिकेट संघाचा देशप्रेमी बाणेदार निर्णय!

दुबई येथील आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला क्रिकेटपटूंनी श्रीलंकेवर लीलया मात करून आठव्यांदा आशिया चषकावर नाव कोरले असले तरी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि पाकिस्तानचे गृहमंत्री असलेले आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्या हस्ते भारतीय महिला संघाने ट्रॉफी स्वीकारली नाही. गेल्या काही वर्षातील भारत-पाकिस्तानमधील तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर मोहसिन नक्वी यांच्या हस्ते चषक स्वीकारायचा नाही, अशी धोरणात्मक भूमिका भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आधीच घेतली असल्यामुळे महिला संघाने घेतलेला हा निर्णय अत्यंत योग्य व कौतुकास्पद आहे. २०२५ मध्ये भारतीय पुरुष क्रिकेट संघानेही आशिया कप जिंकल्यानंतर मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घेण्यास नकार दिला होता. महिला संघानेही त्याच भूमिकेचे समर्थन करत देशाच्या अस्मितेसाठी मिळतीजुळती भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने अंतिम विजेत्या पुरुष आणि महिला अशा दोन्ही आशिया कपच्या ट्रॉफी कायदेशीर प्रक्रियेद्वारे लवकरच सन्मानाने भारतात आणल्या जातील असे म्हटले आहे. असो! आशिया चषक २०२६ च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेचा पराभव करून अंतिम विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय महिला संघाचे तसेच त्यांनी दाखवलेल्या या देशप्रेमी बाणेदार भूमिकेचे मनापासून अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**। दिनविशेष**

# ऐतिहासिक विधेयकातून शेतकऱ्यांना बळ



कोकणात चार शतकांपासून जमीन महसूलाची खोती पद्धत चालू होती. खोत, सावकारांच्या मगरमिठीत सापडले. शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी जागा झाला. सावकारांविरोधात प्रदिर्घ वर्ष चरी या ठिकाणी शेतकऱ्यांचा संप चालला.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग परिसरात तब्बल सात वर्षे शेतकरी संपावर गेले होते. त्या काळातील खोतीपद्धतीविरोधात शेतकऱ्यांनी लढा दिला होता. चरी या ठिकाणी शेतकऱ्यांनी परिषद भरवून लढ्याचे रणशिंग फुंकले होते. एक अभूतपूर्व आंदोलन करण्यात आले होते. परिसरातील १४ गावे या संपात सहभागी झाले होते. १९३३ ते १९३९ या सात वर्षाच्या कालखंडात हजारो शेतकऱ्यांनी अन्नाचा कण न पिकविता संप पुकारला होता. या संपामुळे कसेल त्याची जमीन हे नैसर्गिक न्याय तत्व अंमलात आणणारा कुळ कायदा मंजूर झाला. या ऐतिहासिक विधेयकातून शेतकऱ्यांना बळ मिळाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात कोकणात खोती पद्धती प्रचलित होती. खोती पद्धती म्हणजे खाजगी सावकारी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत खोती पद्धत नष्ट करण्यासाठी ऐतिहासिक विधेयक मांडले होते. या विधेयकाला '१९३७' असे नाव देण्यात आले होते. कोकण भागातील शेतकरी आणि कुळांची खोत (मोठे जमीनदार) यांच्याकडून होणारी आर्थिक लूट थांबवणे आणि जमीन कसेल त्यालाच जमिनीचा मालकी हक्क मिळवून देणे, हा या विधेयकाचा मुख्य उद्देश होता.

कोकणातील जमीन कसण्यास कठीण, डोंगराळ व खाडीकिनारी असली, तरी शेतकऱ्यांनी ती मेहनतीने लागवडीयोग्य केली होती. मात्र, त्या काळात बळावलेल्या 'खोती' पद्धतीमुळे शेतकऱ्यांचे जिणे असह्य झाले होते. सर्वसामान्य शेतकऱ्यांना कर्जाच्या जाळ्यात ओढून त्यांच्या जमिनी बळकावल्या, काही जुलमी खोत आपल्या अधिकाराचा अतिरेक करून शोषण करत. खोतांच्या जुलमामुळे कोकणपट्टीतील वातावरण स्फोटक बनले होते. या अन्यायाविरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शेतकऱ्यांचे नेते नारायण नागू पाटील, यांनी भाई अनंत चित्रे आणि सुरबा नाना टिपणीस, तुकाराम खंडू जाधव यांसारख्या सहकाऱ्यांसह असंख्य शेतकऱ्यांच्या मदतीने जनआंदोलन उभे केले. या चळवळीचे केंद्र होते अलिबाग तालुक्यातील 'चरी' गाव. चरी परिसरातील १४ गावांतील शेतकऱ्यांनी २७ ऑक्टोबर, १९३३ रोजी शेती न कसण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा संप तब्बल सात वर्षे चालला, जो जगातील एकमेव प्रदीर्घ शेतकरी संप मानला जातो. या काळात सावकारांच्या कर्जाची परतफेड न केल्याने सरकारने शेतकऱ्यांची गुरे-ढोरे आणि भांडीकुंडी जप्त केली, तरीही शेतकरी डगमगले नाहीत. या शेतकरी परिषदेनंतरही त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा केला. यासाठी १७ सप्टेंबर, १९३७ रोजी मुंबई विधानसभेत 'खोती पद्धत' नष्ट करण्याचे विधेयक मांडले. १० जानेवारी, १९३८ रोजी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली १० हजार शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा मुंबईवर धडकला. 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व त्यांनी ठामपणे मांडले. अखेर लोकांच्या रेट्यामुळे आणि बाबासाहेबांच्या इशाऱ्यामुळे तत्कालीन महसूलमंत्री मोरारजी देसाई हे चरी येथे आले. त्यांनी मध्यस्थी केली आणि शेतकऱ्यांना जमिनीच्या उत्पन्नाचा न्याय्य वाटा मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नारायण नागू पाटील तसेच शेतकरी यांच्या संघर्षाचा परिणाम म्हणून १५ मे, १९५० रोजी 'खोती निर्मूलन अधिनियम' लागू झाला.

# झोपडपट्टी स्वच्छतेवर जीपीएसची नजर





**| मुंबई | प्रतिनिधी |**

**स्वच्छ-सुंदर मुंबईसाठी पालिकेने आता कठोर पावले उचलायला सुरुवात केली असून झोपडपट्टी स्वच्छतेवर आता 'जीपीएस' यंत्रणेची नजर राहणार आहे. झोपडपट्ट्यांच्या स्वच्छतेमध्ये संबंधित संस्थेला स्वच्छतेआधीचा आणि नंतरचा फोटो टाकणे अनिवार्य केले जाणार आहे. या कामावर 'जीपीएस'ची नजर राहणार असल्याने परिणामकारक स्वच्छता होणार आहे. या संपूर्ण यंत्रणेसाठी पालिका १३६ कोटी रुपयांचा खर्च करणार आहे.**

मुंबईतील सुमारे ४२ टक्के लोकसंख्या झोपडपट्टी भागात राहते. मात्र या ठिकाणचे अरुंद रस्ते, दाट लोकवस्ती आणि अपुऱ्या नागरी सुविधांमुळे या भागातील स्वच्छता परिणामकारक होत नसल्याचा आरोप नेहमीच करण्यात येतो. सध्याच्या यंत्रणेत 'एसएमपीए' योजनेनुसार दररोज झोपडपट्टी स्वच्छतेचे काम केले जाते. यामध्ये घराघरांतून कचरा संकलन, गल्ल्यांची स्वच्छता, कचरा पेट्या व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता, गटार साफसफाई, २० फुटांपर्यंतच्या रस्त्यांची स्वच्छता आणि जनजागृती अशी अनेक कामे केली जातात. मात्र आता मुंबई

**● पालिका करणार १३६ कोटी रुपयांचा खर्च**

महापालिकेच्या माध्यमातून आता अद्ययावत 'बृहन्मुंबई स्वच्छता सेवा योजना' लागू करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पालिकेतील सभागृह नेते गणेश खणकर यांनी दिली. या यंत्रणेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी दरमहा गुणांकन व सोडतीच्या आधारे एका संस्थेला २१ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### अशी असणार योजना

या नव्या योजनेत एका युनिटमध्ये १५० कुटुंबे किंवा ७५० नागरिकांचा समावेश असेल. पात्र संस्थेला किमान पाच आणि कमाल १५ युनिट्सचा कार्यक्षेत्र म्हणून 'वस्ती' देण्यात येईल. प्रत्येक युनिटसाठी संस्थेला मूळ स्वच्छता कामासाठी दरमहा ९० हजार रुपये आणि स्वच्छता साहित्य, मास्क, हातमोजे, जॅकेट, गमबूट, रेनकोट, दैनंदिन नोंदी व मोबाईल वापरासाठी ९ हजार रुपये असे एकूण ९९ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. नव्या यंत्रणेनुसार १०,३०९ युनिट्ससाठी वार्षिक खर्च सुमारे १३६ कोटी रुपये अपेक्षित असून हा खर्च घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या निधीतून करण्यात येणारे पालिकेकडून सांगण्यात आले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ सप्टेंबर
१) श्री.उल्हास यशवंत बांदेकर अलिबाग, दि.१७-९-१९४७
२) श्री. आरूण रघुनाथ पाथरे मु.कुरूळ, अलिबाग, दि.१७-९-१९४८
३) श्री.नरहरी धनाजी तोडणकर मु.धोकवडे, अलिबाग, दि.१७-९-१९३५


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल


## महिला बचत गटांना अन्नसुरक्षा प्रशिक्षण

**| मुंबई | प्रतिनिधी |**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन विभागांतर्गत महिला व बालकल्याण विभागाच्या मार्गदर्शनाखाली यंदाही गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'मोदक महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत महिला बचत गटांकडून तयार करण्यात येणारे उकडीचे आणि तळलेले मोदक मुंबईकरांना उपलब्ध होणार आहेत. यंदाच्या मोदक महोत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महिला बचत गटांना अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सहकार्याने अन्नसुरक्षेबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अन्न व औषध प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत मोदक निर्मिती करताना घ्यावयाची स्वच्छता, अन्नसुरक्षा, अन्न हाताळणी, कच्च्या मालाची गुणवत्ता आणि पॅकिंग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## स्वच्छता मोहिमेचे आयोजन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

आंतरराष्ट्रीय स्वच्छता दिनानिमित्त १९ सप्टेंबर २०२६ रोजी स्वच्छ सागर आणि सुरक्षित तट अभियानांतर्गत मुरुड किनारपट्टी भव्य स्वच्छता मोहिमेचे आयोजन भारतीय तटरक्षक दल केंद्र (मुरुड-जंजिरा), जेएसडब्ल्यू आणि इनकोईस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. याप्रसंगी जेएसडब्ल्यूचे प्रतिनिधी व आयुष रुग्णालयाचे अधिकारी उपस्थित राहणार असून स्थानिक शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी व परिसरातील नागरिकांसह ५०० हून अधिक स्वयंसेवक एकत्र येऊन किनाऱ्यावरील प्लास्टिक कचरा निर्मूलनासाठी श्रमदान करणार आहेत.

## कर्जतच्या इतिहासाची ओळख सर्वांना हवी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात अनेक हिरे रत्न जन्माला आली आहे. त्याचवेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून क्रांतिकारक यांचा मोठा इतिहास कर्जत तालुक्याला आहे. त्यामुळे आपल्या गावाचा, तालुक्याचा इतिहास समजून घेतला पाहिजे, असे आवाहन इतिहास संशोधक सागर सुर्वे यांनी केले.

कर्जत येथील कोकण ज्ञानपीठ कर्जत, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या अंतर्गत ऐतिहासिक व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात इतिहास तज्ञ सागर सुर्वे यांनी कर्जतच्या इतिहासाची




**● सागर सुर्वे यांचे प्रतिपादन**

ओळख या विषयावर प्रभावी व्याख्यान दिले. या व्याख्यानात कर्जतमधील ऐतिहासिक स्थळेच सांगितली नाहीत तर प्रत्येक स्थळाचे भौगोलिक व ऐतिहासिक महत्त्व प्रतिपादित केले. कर्जत तालुक्याचे स्थलशास्त्र, मूर्ती शास्त्र, विज्ञान शास्त्र, तसेच उपग्रह यांचा उपयोग करून कर्जतच्या इतिहासाचा अभ्यास कसा केला याची माहिती देखील दिली. कर्जत तालुक्याचा इतिहास हा दोन हजार वर्षांपूर्वीचा इतिहास आहे. याची माहिती देतानाच कर्जत हे नाव कसे पडले, या भागातून व्यापार कशाप्रकारे चालत असे, टॅक्स कसा वसूल केला जात असे या सर्वांची व्यापक माहिती दिली.



## मुरूड पोलिसांचे रुट मार्च

**| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |**

आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासोबतच हुल्लडबाज व समाजकंटकांमध्ये पोलिसांचा व कायद्याचा धाक निर्माण व्हावा यासाठी मुरुड पोलिसांतर्फे रूट मार्च व फ्लॅग मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

एकदरा पूल येथून श्रीराम बँक, बाजारपेठ मशीद, पूरकर नाका, नगरपरिषद, मसाल गल्ली, गोल बंगला कॉर्नर, पेठ मोहल्ला मशीद, लक्ष्मीखार, दस्तुरी नाका या भागात रूट मार्च करण्यात आले. त्याचप्रमाणे नांदगाव गावातही रुट मार्च करण्यात आले. रूट मार्च करण्याकरिता मुरुड पोलीस ठाण्यातील ०५ अधिकारी, ३६ अंमलदार, एसआरपीएफ प्लाटूनचे १ अधिकारी, २२ अंमलदार व १० होमगार्ड यांचा समावेश होता.



## चिंभावे आरोग्य केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**| महाड | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणा अधिक बळकट व्हावी आणि आणीबाणीच्या प्रसंगी गरजू रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळावेत, या उद्देशाने आदित्य बिर्ला ग्रुप आणि सुहास नामुगरे यांच्या संयुक्त विद्यमाने चिंभावे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट देण्यात आले. या उपक्रमाचे अधिकृत सहकार्य पत्र आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मिनी बेरळीकर यांच्याकडे नुकतेच हस्तांतरित करण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्रात ही सुविधा उपलब्ध झाल्याने आपत्कालीन परिस्थितीत श्वसनाचा त्रास होणाऱ्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिक पातळीवरच तात्काळ उपचार उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांना उपचारासाठी दूरवर धाव घ्यावी लागणार नाही. आदित्य बिर्ला ग्रुप आणि सुहास नामुगरे यांनी जपलेल्या या सामाजिक दायित्वाचे स्थानिक ग्रामस्थांनी स्वागत करत आभार मानले.

ग्रामीण आरोग्याच्या सक्षमीकरणासाठी उचललेल्या या पावलाचे सर्व स्तरातून विशेष कौतुक होत आहे.

> **ग्रामीण भागातील रुग्णांसाठी आपत्कालीन परिस्थितीत ऐन वेळेवर प्राणवायू मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. आदित्य बिर्ला ग्रुप आणि सुहास नामुगरे यांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देऊन एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबवला आहे. या सुविधेमुळे श्वसनाचा त्रास असणाऱ्या रुग्णांवर स्थानिक पातळीवरच तात्काळ उपचार करणे शक्य होईल आणि त्यांची शहरातील धावपळ टळेल.**
> **- डॉ. पद्मिनी बेरळीकर, वैद्यकीय अधिकारी**

## सिडकोच्या सोडतीत ३,१४२ विजेते

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

सिडकोच्या 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' माझी पहिली पसंत या गृहनिर्माण योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीच्या ४ हजार ७७९ सदनिकांची संगणकीय सोडत शुक्रवारी बेलापूर येथील सिडको भवनात काढण्यात आली. या सोडतीत ३ हजार १४२ अर्जदार विजेते ठरले असून, स्वातंत्र्यदिनी सुरू करण्यात आलेल्या योजनेला अर्जदारांचा प्रतिसाद मिळाला.

या योजनेतील ४ हजार ७७९ घरांसाठी ४ हजार १८० अर्जदारांनी नोंदणी केली होती. सिडकोतर्फे १५ ऑगस्टला या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला होता. यामध्ये तळोजा सेक्टर-३९ येथे ४ हजार २२९, कळंबोली बस डेपो येथे २५७ आणि खारघर बस डेपो येथे २९३ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यातील काही सदनिका दिव्यांग अर्जदारांसाठी राखीव होत्या. सोडतीच्या वेळी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, एनआयसीचे संचालक लक्ष्मीकांत गरजे, संचालक नरेंद्र भामरे, पणन व्यवस्थापक श्रीनिवास मोकळीकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संगणकीय सोडत पारदर्शक आणि मानवी हस्तक्षेपविरहित पद्धतीने पार पडल्याचा दावा सिडकोकडून करण्यात आला आहे. यशस्वी अर्जदारांची यादी सिडकोच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

> **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांना नवी मुंबईसारख्या नियोजित व जागतिक दर्जाच्या शहरात परवडणाऱ्या दरात स्वतःचे घर उपलब्ध करून देणे, हा सिडकोच्या गृहनिर्माण उपक्रमांचा प्रमुख उद्देश आहे. या संगणकीय सोडतीच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांचे गृहस्वप्न साकार होत आहेत.**
> **-अश्विन मुदगल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## कृष्णा गांधी यांचे निधन



**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे कृष्णा रुपचंद गांधी यांचे रविवारी (दि.१३) निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक, शैक्षणिक आणि गुजराती समाजात शोककळा पसरली आहे. ते केवळ माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी नव्हते, तर संस्थेच्या ४५ वर्षांच्या वाटचालीतील एक विश्वासू आधारस्तंभ होते.

## दर्शना आठवले यांची फेरनिवड



**| धाटाव | प्रतिनिधी |**

ज्ञानगंगा बहुविकलांग संस्थेची शुक्रवारी (दि.११) सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत संस्थेची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था रोहा या संस्थेच्या कार्यकारिणी समितीचा कार्यकाळ १ ऑक्टोबर २६ रोजी संपत आहे. त्यासाठी नवीन कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यासाठी विशेष वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत आवाजी मतदानाने नवीन कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. यात अध्यक्ष म्हणून दर्शना आठवले, उपाध्यक्ष संजय आर्ते, सचिवपदी गिरीश मोरे, सहसचिवपदी श्रीया जोशी, खजिनदारपदी राजश्री आठवले, सहखजिनदार वृषाली पराडकर तर कार्यकारिणी सदस्यपदी दिधेश शहा यांची पुढील पाच वर्षासाठी निवड करण्यात आली.

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा निर्णय | प्रवेश क्षमतेची मर्यादा नाही**

# पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम आता ऑनलाईन

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेनुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात आता बी.कॉम. UGG०१, 'बीसीए-UGP०६'' हे पदवी शिक्षणक्रम आणि 'एमसीए PGP०१', 'एमबीए P१३०'सारखे पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुरू झाले आहेत. या शिक्षणक्रमांसाठी प्रवेश क्षमतेची कोणतीही मर्यादा नसून कितीही विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे




यांनी दिली. ऑनलाइन प्रॉक्टर पद्धतीने परीक्षा होणार असून १०० विद्यार्थ्यांमागे एक मेंटॉर मार्गदर्शन करणार आहे.

मुक्त विद्यापीठामार्फत दूरस्थ पद्धतीने विविध प्रमाणपत्र, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविले जात आहेत. विद्यापीठाच्या राज्यभरातील अभ्यासकेंद्रांमार्फत हे अभ्यासक्रम राबविले जातात. परंतु, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यापीठामार्फत ऑनलाइन पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांना सुरुवात करण्यात आली. नुकतीच 'यूजीसी'च्या डिस्टन्स एज्युकेशन बोर्डमार्फत (डीईबी) विद्यापीठाला आता बी.कॉम, बीसीए हे पदवी शिक्षणक्रम आणि एमसीए एमबीए सारखे पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यास मान्यता मिळाली आहे. या ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठामार्फत दोन वर्षे तयारी सुरू होती. अभ्यासक्रमाच्या क्रेडिटनुसार त्याचे व्हिडीओ तयार करण्यात आले असून, एका क्रेडिटसाठी १५० व्हिडीओ असणार आहेत. प्रत्येक व्हिडीओ ७ ते १० मिनिटांचा असून, ते विद्यार्थ्याला उपलब्ध करून दिले जाणार आहेत. एक व्हिडीओ अभ्यासल्यानंतर त्यावर प्रश्नावली येणार आहे. ती प्रश्नावली भरून, त्यात उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील व्हिडीओ विद्यार्थ्याला अभ्यासता येणार आहे. तसेच १०० विद्यार्थ्यांमागे १ मेंटॉर असणार आहे. व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप व ई-मेद्वारे या मेंटॉरमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. ऑनलाइन प्रॉक्टर बेस्ड् पद्धतीने या अभ्यासक्रमांची परीक्षा घेतली जाणार आहे. विद्यार्थ्याला शिक्षण देण्यासह विषयाचे आकलन व्हावे, यासाठी प्रत्येक व्हिडीओनंतर प्रश्नावली तयार केली आहे. यंदा विद्यापीठाला एकूण चार ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी मान्यता मिळाली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग खुला झाला आहे. विद्यापीठाच्या या शैक्षणिक पर्वणीचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घेऊन आपला शैक्षणिक स्तर उंचविण्याच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय केंद्राचे विभागीय संचालक डॉ. वामन नाखले यांनी केले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी http://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1322 या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## निवडक

### बांधकामानंतरचा राडारोडा रस्त्यावरच



**श्रीवर्धन :** श्रीवर्धन शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर निवासी संकुले, रिसॉर्ट्स आणि होम-स्टेचे बांधकाम जोरात सुरू आहे. मात्र, बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही इमारत मालक उर्वरित रेचगा, रॅबिट आणि बांधकाम साहित्य रस्त्यावरून न हटवता तसेच टाकून देत आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस आणि गणेशोत्सवाचा सण असल्यामुळे रस्त्यांवर वाहनांची आणि भाविकांची मोठी वर्दळ आहे. अशा स्थितीत रस्त्याच्या कडेला साचलेला हा राडारोडा दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांसाठी अत्यंत धोकादायक ठरत आहे. पर्यटन आणि निवासी विस्ताराच्या दृष्टीने शहराच्या विविध पाखाड्या आणि आळ्यांमधील मोक्याच्या जागांवर बांधकामे सुरू आहेत. ही बांधकामे करताना लोखंडी शिगा, चिरे, रेती, क्रश सॅन्ड आणि खडी हे साहित्य अनेकदा थेट गटारांमध्ये किंवा रस्त्याच्या कडेला टाकले जाते. काम पूर्ण झाल्यावर हे साहित्य उचलण्याची जबाबदारी संबंधित मालक अजिबात घेत नाहीत. सततच्या वाहतुकीमुळे हा विखुरलेला रेचगा रस्त्यावर पसरत असून, पावसामुळे दुचाकी घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. या बेजबाबदार इमारत मालकांच्या वृत्तीवर स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



### रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**खरोशी :** ऑटो रिक्षामध्ये विसरलेली ५० हजारांची रोकड असलेली पर्स पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या प्रामाणिक रिक्षाचालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे. गुरव आळी, पेण येथून प्रवासी घेऊन पेण रेल्वे स्थानक येथे सोडल्यानंतर रिक्षाचालक नरेंद्र रामा ठाकूर यांच्या रिक्षात प्रवाशाची पर्स राहिल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या पर्समध्ये तब्बल ५० हजार रुपये रोख रक्कम होती. पर्समध्ये मोठी रक्कम असल्याचे माहिती असूनही नरेंद्र ठाकूर यांनी पैशांचा कोणताही मोह न ठेवता प्रामाणिकपणा व सामाजिक बांधिलकी जपत पर्स तात्काळ पेण पोलीस ठाण्यात आणून जमा केली. दरम्यान, पर्सचे मालक मंगेश मुरलीधर शिवापुरकरे हे आपल्या कुटुंबीयांसह पेण येथे आले होते. पेण येथून रेल्वे स्थानकाकडे जात असताना त्यांच्याकडून पर्स रिक्षात विसरली होती. पर्स हरवल्याचे लक्षात आल्यानंतर ते चिंतेत असतानाच रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणामुळे त्यांची ५० हजारांची रोकड व पर्स सुरक्षितपणे परत मिळाली. पेण पोलीस ठाण्यात पर्सची खात्री करून ती संबंधित मालकाच्या ताब्यात देण्यात आली. रिक्षाचालक नरेंद्र ठाकूर यांच्या प्रामाणिकपणाचे व माणुसकीचे पेण पोलिसांकडून कौतुक करण्यात आले.



### भजनांमुळे भक्तिमय वातावरण

**पाताळगंगा :** गणरायाच्या आगमनाने घराघरांत मांगल्याचे व पवित्र वातावरण निर्माण झाले आहे. पाच दिवस तसेच अनंत चतुर्दशीपर्यंतच्या गणेशमूर्तींच्या ठिकाणी भजन, आरती व विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. सायंकाळच्या वेळी अनेक गावांतून भजनांचे मंजुळ स्वर कानी पडत असून सर्वत्र गणपती बाप्पा मोरयाचा गजर घुमत आहे. गणरायाची सेवा करण्याच्या उद्देशाने भजनी मंडळाच्या वतीने आंबिवली येथे गणेशोत्सवानिमित्त भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भजनांच्या भक्तिमय स्वरांनी परिसर भारावून गेला. गणेशोत्सवात भजनाला विशेष महत्त्व असून, यंदा तरुण मंडळीही मोठ्या प्रमाणात भजनाकडे आकर्षित होताना दिसत आहेत. ज्येष्ठ मंडळींचाही उत्स्फूर्त सहभाग आहे. नव्या चालीतील अभंग व भक्तिगीतांना भाविकांची पसंती मिळत आहे. भजन मंडळांचे महिनाभर आधीच कार्यक्रम निश्चित असून दहा दिवस गणरायाचे नामस्मरण करत त्याची सेवा घडावी, हाच भजनामागील मुख्य उद्देश असल्याचे जय मल्हार भजनी मंडळाच्या सदस्यांनी सांगितले.



### 'मुका माथम' सण साजरा

**कर्जत :** पिठोरी आमावस्येनंतर एक किंवा दोन दिवसांनी मुका माथम साजरा करण्यात येतो. हा सण झाल्यावर श्री गणेशोत्सव साजरा करण्याची खऱ्या अर्थाने लगबग सुरु होते. यंदा मुका माथम पिठोरी अमावस्यानंतर दुसऱ्या दिवशी साजरा करण्यात आला. यामध्ये महिलांची उपस्थिती मोठ्या संख्येने असते. मुका माथम साजरा करताना दिवसभर सर्वकाही मुक्यानेच करावे लागते. अगदी पहाटे रानात जाऊन मुक्यानेच कचोऱ्याची फुले आणावी लागतात. हल्ली ही फुले आदिवासी लोक बाजारपेठेत आणतात. ज्यांच्या घरी हा सण साजरा करण्यात येतो. त्यांच्या घरी तेथून सायंकाळच्या सुमारास मुक्यानेच ही फुले आणली जातात. सातच्या सुमारास पूजेला सुरुवात होते. पाटावर फुले मांडून पूजेची सुरुवात करण्यात येते. सारे काही मौन पाळून करायचे असते. पिठोरी सारखीच ही पूजा असते. पूजा झाल्यावर हर हर महादेवचा गजर करण्यात येतो. त्यावेळी वाळूमध्ये फुले मिक्स करून ती उडविली जातात. नंतर महाआरती होते आणि महाप्रसादाने सणाची सांगता होते. गावात एक किंवा दोन कुटुंबामध्येच हा सण साजरा करण्यात येतो. त्यामुळे सर्व गावकरी तेथे उपस्थित राहतात. मुका माथमच्या पूजेसाठी कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रेमधील अण्णा बैलमारे यांच्या निवासस्थानी सदाशिव बैलमारे यांनी पूजा केली.



# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



●किहीम श्री प्रशांत (पप्या) यशवंत दळवी यांचे इथली श्रींची भव्य मूर्ती. (छायाचित्र- सुरेश खडपे)




● किहीम येथील सौ. स्वराली अभिजित पेडणेकर यांचे निवासी गणरायाची नयनरम्य सुबक मूर्ती. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● किहीम येथील प्रसिद्ध गणपती कारखानदार सौ. मनिषा हेमंत पेडणेकर यांचे इथे नरसिंह अवताराचा देखावा सादर केलाय. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● तुडाळ येथील सौ. अंकीता सचिन माळी यांनी किल्ले रायगड मेघडंबरीचा देखावा सादर केलाय. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, मु.थळ (चौकोनी होळी), ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती व आकर्षक देखावा. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● अलिबाग चेंढरे भंडारआळी येथील गजानन मोरे यांचे इथली श्रींची भव्य मूर्ती. (छायाचित्र : सुरेश खडपे)



●रोहा तालुक्यातील धाटाव गावचे पत्रकार शशिकांत मोरे याच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला झोपडीच्या देखाव्यात विराजमान करुन पारंपारिक वस्तू या झोपडीत संकलित करुन ठेवल्या आहेत. जुन्या वस्तूची आठवण रहावी हाच छोटासा संदेश या देखाव्याच्या माध्यमातून देण्याचा अनोखा प्रयत्न मोरे परिवाराच्यावतीने करण्यात आला आहे. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● निनाद राऊत सासवणे यांच्या घरी गणपती बाप्पा रा. जि.प.शाळा सासवणे प्रतिकृतीमध्ये विराजमान झाले आहेत. सजावट पाहण्यास करता आजी-माजी विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



● श्री. तुकाराम चांगू न्हावकर मु. न्हावे ता. रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशाची मूर्ती. (छाया - सत्यप्रसाद आडाव)



● श्री. विजय भगत मु. बामणगाव यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर. (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)



● मुरुड मधील गावदेवपाखाडीतील हेमांगी मंगेश झावरे यांची श्रीगणेशमूर्ती मूर्तीकार प्रसाद पाटील. (छायाचित्र : सौरभ नाझरे)



● किहीम येथील सौ. प्रियंका प्रशांत राऊत यांचे निवासी गणेशाची भव्य सजावट. (छाया- सुरेश खडपे)



● अलिबाग चेंढरे भंडारआळीमध्ये पाटील बंधुची गणरायाची आकर्षक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● अलिबाग भंडारआळीमध्ये संतोष मोरे यांचेकडील श्री गणेशाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● किहीम येथील सुगम म्हात्रे यांचे इथली गणरायाची मनमोहक सजावट. (छाया - सुरेश खडपे)




● संगम अलिबाग येथील संदीप राऊत यांचे निवासी श्री गणेशाची मनमोहक सजावट. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री सुधीर अर्चना बाळाजी सावंत मु.पो.नांदगाव ता. सुधागड, जि. रायगड. (छायाचित्र- भूषण सुतार)



● तुडाळ येथील सौ. रुपाली प्रशांत म्हात्रे यांनी गणरायासह भगवान शंकराचा देखावा सादर केलाय. (छायाचित्र- सुरेश खडपे)

# लीड्समध्ये 'इंग्लंडचा राजा'चा भव्य गणेशोत्सव!

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

इंग्लंडमधील लीड्स येथे 'इंग्लंडचा राजा' या सात दिवसांच्या भव्य गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रामगढिया स्पोर्ट्स सेंटर येथे होणाऱ्या या उत्सवाची माहिती लीड्समधील रहिवासी आणि मुळचे पनवेल तालुक्यातील कोल्ही गावचे वैभव पाटील यांनी दिली.



मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा यांच्या भक्ती आणि परंपरेपासून प्रेरणा घेत हा उत्सव आयोजित करण्यात आला आहे.महत्वाचे म्हणजे लालबागच्या राजाची मूर्ती घडवणारे प्रसिद्ध मूर्तिकार संतोष रत्नाकर कांबळी यांनी ही गणेशमूर्ती साकारली आहे.

या सात दिवसांच्या उत्सवात अभिषेक, सामूहिक सत्यनारायण पूजा, सांस्कृतिक कार्यक्रम, भजनसंध्या, होम-हवन आणि नवसाची भिंत यांसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यूकेमधील भारतीय समाजाला आपल्या संस्कृती आणि परंपरेशी जोडण्याबरोबरच भावी पिढ्यांमध्ये भारतीय संस्कृतीची जपणूक करण्याचा प्रयत्न या उत्सवातून केला जात आहे.

लीड्स कनेक्टच्या वतीने आणि चेअरमन सुहास पवार यांच्या नेतृत्वाखाली या उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, भारत, यूके आणि युरोपमधील सांस्कृतिक व सामाजिक संबंध अधिक दृढ करण्याचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

लीड्समध्ये रंगणाऱ्या इंग्लंडचा राजाफच्या या सात दिवसांच्या गणेशोत्सवाची माहिती पनवेलमधील कोल्ही गावाशी नाते असलेल्या वैभव पाटील यांनी दिल्याने या उत्सवाला पनवेलशीही एक विशेष नाते जोडले गेले आहे.

## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस

उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभागात), पनवेल महानगरपालिका करीता किटकनाशके व रासायनिक जंतुनाशके पुरविणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता दि. १५/०९/२०२६ पर्यंत सकाळी ११:०० पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली होती. तरी प्रशासकीय कारणास्तव सदर दरपत्रके जमा करणेकरिता दिनांक २१/०९/२०२६ सकाळी ११:०० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. २१/०९/२०२६ पर्यंत सकाळी ११:०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची दरपत्रके दि. २१/०९/२०२६ पर्यंत सकाळी ११:०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात अथवा panvelcorporation.swm@gmail.com या मेल आयडी वर स्वीकारण्यात येतील.

सही/-
उपआयुक्त
पनवेल महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग.
पनवेल महानगरपालिका

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे गिरवले, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं | खाता नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| २६/२/१ | १६९ | ०-१४-०० पो.ख. ०-००-०० खरेदी क्षेत्र ०-१४-०० | ३.४५ |
| | एकुण क्षेत्र | ०-१४-०० | |
| २६/४ | १६९ | ०-०५-६० पो.ख. ०-०१-५० खरेदी क्षेत्र ०-०७-१० | १.६६ |
| | एकूण क्षेत्र | ०-०७-१० | |
| २६/६ | १६९ | ०-१०-६० पो.ख. ०-०१-५० खरेदी क्षेत्र ०-१२-१० | १.५० |
| | एकुण क्षेत्र | ०-१२-१० | |
| १६/३ | १६९ | ०-४३-१० पो.ख.०-०१-०० खरेदी क्षेत्र ०-४४-१० | ५.६९ |
| | एकूण क्षेत्र | ०-४४-१० | |
| २१/२/अ | १६९ | ०-०२-०० पो.ख. ०-००-८० खरेदी क्षेत्र ०-०२-८० | ०.०३ |
| | एकूण क्षेत्र | ०-०२-८० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात नियामुलहक अजिज शाह यांच्या नावाची नोंद आहे, त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलाना खरेदी देण्याची ठरली असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत, दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घमुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरीता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

दिनांक : १६.०९.२०२६
ठिकाण : पनवेल

**ॲड. प्रविणकुमार पांडुरंग मोरे**
पत्ता : ऑफीस नं.०३, आशा हॉमोनी को ऑप हौ.सो प्लॉट नं.१४, सेक्टर १७, खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६ मो.नं. ९०२९५८९९९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे कि, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे गिरवले, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं./हिस्सा नं | खाता नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| १०५/१ | ९१ | ०-२६-३० पो. ख ०-०१-८० खरेदी क्षेत्र ०-२८-१० | ५.८१ |
| | | एकुण क्षेत्र ०-२८-१० | |

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी हक्कात १ श्री सुरेश हिराजी मोरे २. श्री. हेमचंद्र हिराजी मोरे यांच्या नावाची नोंद आहे, त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिलाना खरेदी देण्याची ठरली असुन सदर व्यवहाराबाबत वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे गहाणखत, दानपत्र, बक्षीसपत्र, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगीहक्क, विकसनकरार, समजोताकरार, अल्प किंवा दिर्घमुदतीचा भाडेपट्टा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने तिच्या असलेल्या हक्कांबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसांपर्यंत खालील पत्त्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नाही आली तर वर नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे खरेदी करण्याकरीता आमचे अशिल यांना कोणतीही बाधा नसेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १६.०९.२०२६
ठिकाण : पनवेल

**ॲड. प्रविणकुमार पांडुरंग मोरे**
पत्ता : ऑफीस नं. ०३, आशा हॉमोनी को ऑप हौ.सो प्लॉट नं.१४, सेक्टर १७, खांदा कॉलनी, पनवेल ४१०२०६ मो.नं. ९०२९५८९९९०

## जाहीर नोटीस

दिनांक : १७ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-कळंबोली, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.- पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जगदीशकुमार भेरूलाल जैन | २० | ० | १-४८-०० | ५ | ६६ |
| | २१ | २ | १-८७-०० | १ | ८८ |
| | २९ | ५ | ०-४७-०० | ० | ४७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- १७/०९/२०२६

## महाराष्ट्र शासन
### महसूल व वन विभाग
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण, जि.रायगड**
दूरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com

महसूल शाखा क्र.फौजदारी/कात-४/मृत्यु दाखला/दा.क्र.६६/२०२६ दिनांक :- /०७/२०२६

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

जगदिश वसंत पाटील,
रा.काळेश्री, ता.पेण, जि.रायगड. — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत काळेश्री,
ता.पेण, जि.रायगड. — सामनेवाला

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे काका महादेव लक्ष्मण पाटील यांचा मृत्यु दिनांक २५/०५/१९८२ रोजी मौजे काळेश्री, ता. पेण येथे झाला परंतू त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत काळेश्री, ता. पेण, जि. रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यू नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांनी विनंती केलेल्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्युनोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही /-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विदयमान मालक १) आशा जनार्दन घायले २) राजेंद्र भिमराव कोलटक्के यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहेत सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे किकवी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १०५ | ३/ब | १-४३ -०० पैकी खरेदी देणार यांचे अविभक्त हिश्श्याचे क्षेत्र ०-७१-५० | ०-६९ |
| १०५ | ३/क | ०-२२-०० पैकी खरेदी देणार यांचे अविभक्त हिश्श्याचे क्षेत्र ०-११-०० | ०-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १७/०९/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

# विसर्जन मिरवणुकीत ग्रामस्थांचा सहभाग



**पाली/गोमाशी** : सुधागड तालुक्यात दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडले. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मोठ्या भक्तिभावाने स्थापन करण्यात आलेल्या बाप्पाला आज दुसऱ्या दिवशी ढोल-ताशाच्या गजरात निरोप देण्यात आला. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याफ च्या जयघोषाने संपूर्ण गाव दणाणून गेले होते. गावातील तरुण मंडळाने पारंपरिक वाद्य वाजवत मिरवणुकीत उत्साह वाढवला. महिला भगिनींनी ठिकठिकाणी औक्षण करून बाप्पाला वंदन केले. विसर्जन मिरवणुकीत लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गडब येथे दिड दिवसाचे गणपतीचे विसर्जन

| गडब | वार्ताहर |

आराध्य दैवत गणरायांची प्रतिष्ठापणा करुन त्याची मनोभावे पुजा करुन पुढच्या वर्षि लवकर या असा निरोप दिड दिवसाचे गणपतीचे गडब येथील तलावात उत्साहात विसर्जन करण्यात आले. सर्वाच्या आवडत्या गणेश उत्सवाला प्रारंभ होवून गणेश चतुर्थीला गणरायांची प्रतिष्ठापणा करुन दिड दिवसाच्या गणपतीना भावपुर्ण वातावरणात परंपरेनुसार भजनाच्या तालावर मिरवणुका काढुन येथील तलावात मोठ्य उत्साहात विसर्जन करण्यात आले. या मिरवणुकात ज्येष्ठ नागरिकासह, लहान मुले स्त्रिया, गणेशभक्त सहभागी झाले होते. सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुण पोलिसांनी बदोबस्त ठेवला होता तर विसर्जन मिरवणुकाचे वेळी वाहतुक कोंडी होणार नाही यांची खबरदारी घेण्यात आली होती.

## MAHAVITARAN — Invitation for bids on E-Tendering basis
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Publication of NIT in News Paper and MSEDCL Web site : 17/09/2026

| Sr. No. | Tender No. | Brifef Scope of work | Tender amount | Tender Fees | Tender Publication Date: |
|---|---|---|---|---|---|
| 1. | SE/PC/HR/T-06 /2026-27 | Work of providing skilled outsourcing workers on contract basis at Pen Testing Division and Pen Circle office under Pen circle. | Rs. 82,55,000/- | 5000/- +18% GST | Submission of bid: 17/09/2026 To 27/09/2026 up to 23:55 Hrs. online |

For details visit website http://etender.mahadiscom.in/eatApp
PRO No. 94 — Superintending Engineer, MSEDCL, O&M Circle, Pen

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.विजय शांताराम पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेतजमीन मिळकत सर्व्हे नं १६४/१ ज्याचे क्षेत्रफळ ४.२८ आर चौ.मी. जागा विकत घेणार आहेत. तरी बिनशेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १७/०९/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि.रायगड
**फेर ई-निविदा सुचना क्रमांक (११)**
**सन २०२६-२७ (दुसरी वेळ)**
**अमृत २.० अभियान**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे कडुन बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुण्यातील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मॅन्ग्रोव्ह परिसराचे पुनरुज्जीवन, विकास व सुशोभीकरण करणे या कामा करिता फेर ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक १७/०९/२०२६ ते २४/०९/२०२६ पर्यंत मागवित आहेत.

टिप:- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहीती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

## जाहिर नोटीस

याद्वारे जाहीर करण्यात येते की, आमचे अशील (यापुढे "प्रस्तावित खरेदीदार" असे संबोधण्यात येईल) हे एका सामंजस्य करारान्वये, मिळकतीचे विद्यमान मालकधविक्रेता (यापुढे "मालकधविक्रेता" असे संबोधण्यात येईल) यांच्याकडून, मौजे तोंडली, पोस्ट डोणवत, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील, खाली नमूद सर्व्हे क्रमांक व त्यांचे क्षेत्रफळ असलेली शेतजमीन (यापुढे "सदर मिळकत" असे संबोधण्यात येईल) खरेदी करत आहेत:

| Sr. No | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ(गुंठे) | Sr. No | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ(गुंठे) | Sr. No | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ(गुंठे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 10/2 | 143 | 2 | 11/2 | 23 | 3 | 15/3 | 36.90 |
| 4 | 15/5 | 17 | 5 | 15/6/अ/1/अ | 22 | 6 | 15/6/ब/3 | 26 |

**एकूण : २६७.९० गुंठे**

सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणत्याही व्यक्तीस कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी या नोटिशीच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत, पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली नमूद पत्त्यावर कळवावे, अन्यथा असा दावा माघार घेतला असे समजण्यात येऊन, सदर मिळकत सर्व बोजांपासून मुक्त आहे असे गृहीत धरून खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

स्थळ : ठाणे
दिनांक : , सप्टेंबर, २०२६

स.-/
**अरविंद चौधरी**
**प्रस्तावित खरेदीदारांतर्फे वकील**
**चौधरी सदन, नवीन चिकणनगर, रामबाग - ०४, कल्याण, ठाणे ४२१ ३०१.**
**मोबाईल: +९१ - ८८२८२ ४२६५४**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे पोशिर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| पुनम ए. डोंगरा | ६ | २३ | ०-५५-२० | ० | २३ |
| पुनम ए. डोंगरा राजेश अमरलाल ठाकुर | ३१ | ११ | १-४७-०० | ० | ६२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. २, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
**ॲड.नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- १७/०९/२०२६
मो.नं. ९३७२९६४६६५

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture Workshop office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९
- TANNA FINSERV शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्क: ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालक स्वप्निला मिलिंद कवळे रा.वरसोली, अलिबाग, जि.रायगड यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर चौ.मी) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग जि. रायगड | २७९/१/५ | २-०३-०० | २०.३० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१७.०९.२०२६

सही/-
**ॲड. मच्छिंद्र एस. म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या नोटिसने असे कळविण्यात येते कि आमचे अशील यांनी मौजे सालवड, तालुका कर्जत, रायगड येथील शेतजमीन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री विजय वसंत पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असून, सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मौजे सालवड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील मिळकतीचे वर्णन**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.प्र | आकार |
|---|---|---|---|
| ४२ | २ | ०.३७.४० | ५.६७ |

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षिस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्युपत्रांकित, चार्ज लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधितांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापसून १४(चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली

ठिकाण- कर्जत
तारीख- १७.०९.२०२६

सही/-
**अधिवक्ता पोर्णिमा आनंद जाधव**
मो नं-९७६४५४७६४३
पत्ता - मार्वल शिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील श्रीमती. शामल प्रमोद थरवळ, श्री. राजेंद्र पंढरीनाथ खिसमतराव, श्रीमती अरुणा विनय जोगदेव, श्री.अतुल रमेश रोडगे, श्री. अमर रमेश रोडगे, रा.नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-नागाव,ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ६२४/२, क्षेत्र ०-०४-७० हे.आर + पो.ख.०-००-८० हे. आर, एकूण क्षेत्र ०-०५-५० हे. आर, आकार रु.२.२६ पैसे.**

तरी वर वर्णन केलेली बागायत मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतींसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलंवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १७/०९/२०२६

सही/-
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर**
रा. ५/३, आत्माराम नगर,
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६




● अनिकेत महेश पाटील मु. कमळपाडा,पो.शहाबाज, (श्री. स्वामी समर्थ सजावट)



● कु.इरा निखिल माळवी (धोकवडे) यांच्या घरचा बाप्पा.



● उरण तांडेलवाडी येथील सोहम चांदोरकर यांच्या घरातील गणेशाची आकर्षकमूर्ती व सजावट. (छाया : सुनिल ठाकूर)



● मंजिरी योगेश वावेकर (मेढेखार-अलिबाग) मुंबई-पुणे मिसिंग लिंक देखावा.



● चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ, यांच्या मांडवखार, ता. अलिबाग येथील निवासस्थानी आरुढ श्री गणेशाची मूर्ती, मूर्तीकार, हनुमान विश्वनाथ नाईक, कळवे, हमरापूर, ता. पेण



● माणगाव तालुक्यातील आडघर गावचे शिवाजी दत्ताराम दसवते यांनी झुलता पर्वत आकर्षक देखाव्यातून स्थानापन्न केलेले गणराय. (छाया : सलीम शेख, माणगाव)



● श्री. नकुल नाईक मु. बामणगाव आदिवासीवाडी यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)



● कु. नैतिक प्रसन्न बुटाला, वय वर्ष १५, राहणार-पोलादपूर-रायगड, एक सुंदर असा राजवाडा स्टाईल डेकोरेशन २०२६ सादरीकरण.



● आमडोशी-नागोठणे येथील निलेश भिकाजी जांबेकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पांचे दर्शन घेताना निलेश जांबेकर, सौ. माधवी निलेश जांबेकर व कुमार देवांश निलेश जांबेकर. ( छायाचित्र- महेश पवार, नागोठणे)



● चिर्ले येथील शिवदास कृष्णा पाटील यांच्या घरातील गणेशाची मूर्तीवर आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुनिल ठाकूर)



● मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे नगरसेवक तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख आदेश दांडेकर आपल्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छाया : राजीव नेवासेकर)



● मुरुडचे माजी तहसीलदार नयन कर्णिक आपल्या निवासस्थानी स्थानापन्न झालेल्या गणरायाला वंदन करताना. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● कु.सौरभ घरत मु.कुंठ्याची गोठी बामणगाव यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते बामणगाव)



● श्री. करण पाटील मु.वढाव बामणगाव यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेताना, श्री. प्रतिक भालचंद्र खारकर (सामाजिक कार्यकर्ते, बामणगाव)



● माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते रणधीर महादेव कनोजे यांच्या निवासस्थानी सजावटीसह स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)



● माणगाव तालुक्यातील आडघर गावचे महादेव रामचंद्र दसवते यांनी दत्त मंदिर गाभारा आकर्षक देखाव्यातून स्थानापन्न केलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)



● माणगाव तालुक्यातील चेरवली गावचे सामाजिक कार्यकर्ते संतोष खडतर व साहिल खडतर यांनी आपल्या संकल्पनेतून साकारलेले मोबाईलच्या दुनियेत हरवलेले बालपण, बालपण देगा देवा'देखाव्यातून सामाजिक संदेश पारंपरिक खेळ, जुन्या आठवणी आणि संस्कृतीचे दर्शन अशा आकर्षक देखाव्यातून स्थानापन्न केलेले गणराय. (छायाचित्र : सलीम शेख, माणगाव)

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)